नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

कै. भाऊजी दफ्तरी स्मृती
संदर्भ ग्रंथालय
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

या अंकांत

उपनिषदर्थव्याख्या — कै. डॉ. भाऊजी दफ्तरी
प्राचीन विदर्भाचें काव्य — नारायण नागोराव हूड
याशिवाय संघवार्ता, लवादाचा निर्णय,
गतवर्षीचें कार्यवृत्त वगैरे

वर्ष ११ — संपादक : — मे १९५६
अंक २ — पां. कृ. सावळापूरकर — किंमत आठ आणे

विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

जाहीर सूचना

विदर्भ साहित्य संघाने यंदा टिळक–आगरकर शतसांवत्सरिक उत्सव करण्याचें ठरविलें आहे. ह्या प्रसंगीं नामवंत विद्वानांचीं टिळक–आगरकरविषयक व्याख्यानें आयोजित करण्याचा विचार आहे. तसेंच महाविद्यालयीन व उच्च–माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांकरितां मराठी भाषेंतून निबंधस्पर्धा आयोजित करण्यांत आली आहे.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरितां विषय.

१. टिळकांचें राजकीय तत्त्वज्ञान.
२. टिळकांचें भारतीय राजकीय लढ्यांतील स्थान.
३. आगरकरांचा बुद्धिवाद.
४. महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळींतील आगरकरांचें स्थान.

निबंध १५०० ते २००० शब्दांचा असावा.

उच्च माध्यमिक शालेय विद्यार्थ्यांकरितां विषय.

१ टिळकांचें विद्यार्थी जीवन.
२. टिळकांची थोरवी.
३. आगरकरांचें जीवन.
४. आगरकरांची थोरवी.

निबंध ८०० ते १००० शब्दांचा असावा

मध्यप्रदेशांतील विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेऊं शकतील. निबंधासोबत उमेदवार विद्यार्थी असल्याचा व त्यानेच निबंध लिहिल्याचा त्याचे शिक्षणसंस्थेंतील प्रमुखाचा दाखला पाठविणें आवश्यक आहे.

निबंध १५ जून १९५६ पर्यंत सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर–१ या पत्त्यावर पोहोंचावयास पाहिजेत.

प्रत्येक विद्यार्थी टिळक व आगरकर यांचेसंबंधी प्रत्येकीं एक असे एकूण दोन निबंध पाठवूं शकेल. निबंधास बक्षिसें पुढीलप्रमाणे आहेत.

महाविद्यालयीन शालेय विद्यार्थ्यांकरितां

टिळक : पहिलें बक्षीस रु. ५०;
दुसरें बक्षीस रु. २५;

आगरकर : पहिलें बक्षीस रु. ५०;
दुसरें बक्षीस रु. २५.

उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांकरितां

टिळक : पहिलें बक्षीस रु. २५;
दुसरें बक्षीस रु. १५;

आगरकर : पहिलें बक्षीस रु. २५;
दुसरें बक्षीस रु. १५.

टिळक व आगरकर यांचीं तैलचित्रें काढून घेऊन तीं विदर्भ साहित्य मंदिरांत लावण्याचाहि विचार आहे.

वरील कार्याकरिता ज्यांना साहाय्य देण्याची इच्छा असेल त्यांनी तें सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांचेकडे पाठविण्याची कृपा करावी, ही विनंती.

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. सं.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :
पां. कृ. सावळापूरकर

संपादक मंडळ :
कृ. व्यं. पेशकार
मा. ल. व्यवहारे
व. कृ. वऱ्हाडपांडे
प्र. दे. कोलते
रा. ना. घाटोळे
भा. श्री. परांजपे
तु. ना. काटकर

वर्ष ११ वें : अंक २ रा

मे १९५६

संपादकीय

विदर्भ साहित्य संघाच्या कार्यकारी मंडळानें 'युगवाणी'च्या संपादकपदावर माझी नियुक्ति केली याबद्दल मी संघाचा फार ऋणी आहें. 'युगवाणी'च्या संपादकांची आतापर्यंत थोर परंपरा चालत आली आहे, त्यांत मी कसा काय बसूं शकेन याबद्दल मी फार साशंक आहे. मागील वर्षाच्या संपादकांनी गेल्या अंकांत माझ्याबद्दल गौरवपर लिहिलें आहें, त्यासाठी मी त्यांचाहि फार कृतज्ञ आहे. पण त्या वर्णनावरून श्री. भाऊसाहेब पंडित यांचें स्नेहशील अंतःकरण आणि त्यांच्या मजबद्दलच्या अपेक्षा हेंच काय तें व्यक्त होतें, असें मी समजतो. कारण तें माझें यथार्थ वर्णन नव्हे याला माझें अंतःकरण साक्षी आहे. तथापि त्यांच्या आणि जाणत्या वाचकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा यावच्छक्य मी प्रयत्न करीन येवढें अभिवचन द्यावयास हरकत नाही.

'युगवाणी'च्या कामीं मला वेळोवेळीं सहाय्य करावयास ज्यांनी संमति दिली त्या नव्या संपादक मंडळाचाहि मी फार आभारी आहें.

'युगवाणी'च्या स्वरूपासंबंधी संपादक मंडळाच्या ज्या कल्पना आहेत त्याचें यथावकाश विवरण करूं. आज व्यक्तिशः माझ्या कांही कल्पना मांडतों.

'युगवाणी' हें एका प्रमुख व प्रातिनिधिक साहित्य संस्थेचें मुखपत्र असल्यामुळे तें पुरेसें वजनदार व भरीव असलें पाहिजे, याबद्दल कोणाचेंहि दुमत होणार नाही. पण अभ्यासपूर्ण लेख म्हटला की तो जड या सदरांत जाऊन सामान्य वाचकांना त्याचें आकर्षण वाटत नाही. तेव्हा बहुसंख्य वाचकांचें अनुरंजन करावयाचें झालें तर मासिक पुरेसें आकर्षक असलें पाहिजे असें एक मत आहे याचीहि मला जाणीव आहे. परं जडता किंवा आकर्षकता या गोष्टी अंशतः लेखाचा विषय व शैली यावर अवलंबून असल्या तरी बहुशः त्या वाचकांच्या मनोवृत्तीवर व आवडीवर अवलंबून असतात. विदर्भ साहित्य संघासारख्या संस्थेचा जो सभासद होतो तो निदान उच्च ज्ञानाभिलाषी असला पाहिजे अशी माझी अपेक्षा आहे. तेव्हा 'युगवाणी'ने प्रामुख्याने आपलें रंजन करावें अशी त्याची दृ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असणार नाही. युगवाणीचें स्वरूप चिल्लर आणि थिल्लर असूं नये व तें जड असलें तरी निरुपयोगी असूं नये व त्याचा कांही एक सांस्कृतिक दर्जा असावा असें मला वाटतें. व ते तसें करण्याचा माझा प्रयत्न राहील.

विदर्भ साहित्य संघाच्या हालचालींची अधिकृत माहिती देणें व उत्तम साहित्य पुरविणें असें द्विविध स्वरूप युगवाणीचें प्रथममासून राहात आलें आहे. उत्तम साहित्य पुरविण्याची संपादकाची कितीहि इच्छा असली तरी त्याच्या मधुकरींत जो माल पडेल त्यावरच त्याला निर्वाह करावा लागणार. चांगल्या साहित्याला मोबदला देण्याचीहि 'युगवाणी'ची शक्ति नाही. अशा अवस्थेंत संपादकाचें कार्य किती कठीण आहे याची कल्पना करतां येईल. म्हणून मौलिक स्वरूपाच्या अभ्यासपूर्ण लेखांचा पुरवठा आम्हाला सतत करीत राहावा अशी विशेषतः विदर्भस्थ लेखकांना माझी विनंती आहे.

मराठींत प्रसिद्ध होणाऱ्या महत्वाच्या ग्रंथांचा परिचय 'युगवाणीं'त येत राहावा व त्यामुळे केवळ 'युगवाणी' वरूनहि वाचकांस मराठी वाङ्मयक्षेत्रासंबंधी यथार्थ कल्पना होत राहावी अशी माझी इच्छा आहे. तरी असे सद्ग्रंथ त्यांच्या कर्त्यांनी आमच्याकडे अवश्य पाठवावे अशी विनंती आहे. चिल्लर ग्रंथांची केवळ पोच देण्यांत येईल. ग्रंथपरिचय व परीक्षण शक्य तर त्या त्या विषयाच्या तज्ञाकडून करवून घेण्याचा प्रयत्न राहील.

मागील संपादकांच्या ज्या योजना व लेखमाला अजून अपुऱ्या असतील त्या पूर्ण करणें व त्यांचे सर्व निर्णय बंधनकारक मानणें हें त्यांचा उत्तराधिकारी म्हणून माझें नैतिक कर्तव्य आहे. तें मी अवश्य बजावीन.

आता कवितांच्या प्रसिद्धीबाबत थोडें लिहावयाचें आहे. आमच्याकडे जें साहित्य प्रसिद्धीसाठी येऊन पडलेलें आहे त्यांत कवितांचाच भरणा फार मोठा आहे. इतका की त्यांतील पसंत कविताच प्रसिद्ध करतों म्हटलें तर कित्येक वर्षे गुजराण होण्यासारखी आहे. म्हणून कवि-मित्रांना अशी विनंती आहे की आम्ही तशी खास याचना केल्याशिवाय कोणीहि आपली कविता इतउत्तर प्रसिद्धीसाठी पाठवूं नये. कवितानियोजन करण्याचा प्रसंग दुर्दैवाने आमच्यावर आला आहे, त्याला इलाज नाही. आलेल्या कवितांची पोच देणेंहि कठीण जाईल अशी स्थिति आहे.

मला संपादनकार्याचा पूर्वीचा अनुभव नाही. गेलीं तीस वर्षे मी सामान्य शिक्षकाचा व्यवसाय करीत आलों आहे. पण संपादक हा शिक्षकाचा एक पर्याय आहे अशी माझी समजूत असल्यामुळे थोडासा धीर वाटतो. 'विद्या वय द्रविण रूप' यांपैकी वय सोडलें तर माझ्या गाठीं कांही एक नाही. व जें आहे असें म्हणतों त्यांत माझी करामत किंवा प्रयत्नहि कांही एक नाही. आपण सर्वांनी माझी प्राणप्रतिष्ठा या जागीं केली आहे, त्याअर्थी आपणा सर्वांचे प्राण माझ्या ठिकाणीं संक्रमित झाले आहेत व माझें बळ हें शेवटीं पर्यायानें आपलेंच बळ आहे याची मला जाणीव आहे.

तैसा तुम्ही मी अंगिकारिला ।
सज्जनीं आपुला म्हणीतला ।
तरी उणें सहजे उपसाहला ।
प्रार्थूं काई ॥

—संपादक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुंडकोपनिषद्

कै. डॉ. के. ल. उर्फ भाऊजी दप्तरी

मुंडक २, खंड १

मुंडक २, खंड १, श्लोक १–३

तदेतत्सत्यम् । यथा सुदीप्तात्पावकात्
विस्फुलिंगाः सहस्रशः प्रभवंते सरूपाः ।
यथाक्षराद्विविधाः सौम्यभावाः प्रजायंते
तत्रचैवापियंति ।।१।।

दिव्योह्यमूर्तः पुरुषः सबाह्याभ्यंतरो ह्यजः ।
अप्राणोह्यमनाः शुभ्रोह्यक्षरात्परतः परः ।।२।।

एतस्माज्जायते प्राणो मनः सर्वेंद्रियाणि च ।
खं वायुर्ज्योतिरापः पृथिवीविश्वस्यधारिणी ।।३।।

अर्थः—हें पुढे जें सांगितलें आहे तें अगदी खरें आहे. ज्याप्रमाणे चांगल्या रीतीने पेटलेल्या विस्तवांतून, त्यासारखेच [सरूपाः] हजारों विस्फुलिंग (म्हणजे ठिणग्या) उत्पन्न होतात, त्याप्रमाणेच हे बाळा, [सौम्य] त्या अक्षरापासून अनेक प्रकारच्या वस्तु उत्पन्न होतात आणि त्यांतच जाऊन मिळतात ।।१।। शरीरांत राहणारा तो आत्मा [पुरुषः स] अमूर्त म्हणजे आकाररहित, दिव्य म्हणजे अलौकिकगुणसंपन्न, कोणापासून न जन्मलेला [अजः] बाहेरहि असणारा आणि आंतहि असणारा असा [बाह्याभ्यंतरः] आहे. त्याला प्राण नाही, त्याला मन नाही. तो शुभ्र म्हणजे निष्कलंक आहे. तो अक्षर आहे म्हणजे त्यांतून कितीहि इतर भाव उत्पन्न झाले तरी तो क्षीण होत नाही. तो आंतमध्ये असलेल्या जीवाच्याहि आंतमध्ये आहे. [परतः परः] ।।२।। ह्या आत्म्यापासूनच प्राण, मन, सर्व इंद्रियें, आकाश [खं], वायुः, तेज [ज्योतिः], पाणी [आपः] आणि सर्व विश्वाला धारण करणारी पृथ्वी उत्पन्न होतात. ।।३।।

टिप्पणें—पुरुषः—पुरि शरीरे शेते स पुरुषः। कठांत ३ । ११ मध्ये जो पुरुष सांगितला तोच येथेहि अभिप्रेत आहे.

"अक्षरात्परतः परः" हा भ्रष्ट पाठ आहे अशी खात्री वाटते. मूळ पाठ "अक्षरः परतः परः" असाच असला पाहिजे. कारण सध्याच्या पाठाप्रमाणे अक्षराच्याहि पलीकडे कांहीं आहे असा अर्थ होईल, पण तसें तर कांहीं नाही. म्हणून श्री शंकराचार्यांनी 'अक्षर' ह्याचा अर्थ "उपाधियुक्त अक्षर" असा केला आहे. "अक्षरा"चा अर्थ बदलविण्यापेक्षा पाठ भ्रष्ट झाला आहे असें मानणेंच अधिक योग्य आहे. "परतः परः" ह्याचा अर्थ, कठ ३ । ११ येथील वर्णनावरून चांगला समजेल.

विश्व—म्हणजे मनुष्यसमाज हा अर्थ मुंडक १।१।१, २।१।१० आणि २।१।४ येथेहि चांगला जुळतो. ह्या खंडांत अव्याकृत ब्रह्म व त्यापासून झालेली जगाची उत्पत्ति वर्णिली आहे व पुढील खंडांत व्याकृत ब्रह्म म्हणजे जीव वर्णिला आहे हें लक्षांत ठेवावें.

मुंडक २, खंड १, श्लोक ४–९

अग्निर्मूर्धाचक्षुषीचंद्रसूर्यौ ।
दिशः श्रोत्रे वाग्विवृताश्ववेदाः ।।
वायुः प्राणो हृदयं विश्वमस्य ।
पद्भ्यां पृथिवी ह्येष सर्वभूतांतरात्मा ।।४।।

तस्मादग्निः समिधोयस्य सूर्यः ।
सोमात्पर्जन्य ओषधयः पृथिव्याम् ।।

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुमान् रेतः सिंचति योषितायाम् ।
बह्वीः प्रजाः पुरुषात्संप्रसूताः ॥५॥

तस्मादृचः सामयजूंषि दीक्षाः ।
यज्ञाश्च सर्वे क्रतवो दक्षिणाश्च ॥
संवत्सरश्च यजमानश्च लोकाः ।
सोमो यत्र पवते यत्र सूर्यः ॥६॥

तस्माच्च देवा बहुधा संप्रसूताः ।
साध्या मनुष्याः पशवो वयांसि ॥
प्राणापानौ व्रीहियवौ तपश्च ।
श्रद्धा सत्यं ब्रह्मचर्यं विधिश्च ॥७॥

सप्तप्राणाः प्रभवंति तस्मात् ।
सप्तार्चिषः समिधः सप्तहोमाः ॥
सप्त इमे लोका: येषु चरंति प्राणाः ।
गुहाशया निहिताः सप्त सप्त ॥८॥

अतः समुद्रा गिरयश्च सर्वे ।
अस्मात्स्यंदंते सिंधवः सर्वरूपाः ॥
अतश्च सर्वा ओषधयो रसश्च ।
येनैष भूतैस्तिष्ठते ह्यंतरात्मा ॥९॥

अर्थः—द्युलोक म्हणजे तारे जेथे असतात व जेथे चंद्र व सूर्य असतात तो प्रदेश [अग्नि] हा त्याचा मूर्धा होय. चंद्रसूर्य हे त्याचे डोळे होत. दिशा ह्या त्याचे कान होत. विस्तृत असे [विवृत] जे वेद तेच त्याचें बोलणें होय. वायु म्हणजे वारा हा त्याचा श्वासोच्छ्वास [प्राणः] होय. मनुष्यसमाज [विश्व] हाच त्याचें हृदय म्हणजे मन होय. पृथिवी हीच त्याचे पाय होत. सर्वभूतांतरात्मा हा असा आहे. ॥४॥ ज्यांत सूर्यरूपी समिधा पेटण्यास टाकली आहे तो अग्नि म्हणजे उष्णता त्या ब्रह्मापासून उत्पन्न झाली. त्या सूर्याच्या पेटण्यापासून सोम म्हणजे पाण्याची हवेंतील वाफ उत्पन्न झाली. सोमापासून पर्जन्य उत्पन्न झाला. त्या पर्जन्यापासून पृथिवीवर औषधि उत्पन्न झाल्या. त्या औषधीपासून मनुष्यांत रेत उत्पन्न झालें. तें रेत मनुष्य स्त्रियेंत टाकतो व त्यापासून प्रजा उत्पन्न होते. ह्याप्रमाणे त्या अक्षर पुरुषापासून म्हणजे ब्रह्मापासून पुष्कळ प्रजा उत्पन्न झाल्या. ॥५॥ ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, यज्ञकर्त्यांने पाळावयाचे नियम [दीक्षा], सर्व यज्ञ, सयूप यज्ञ [क्रतु], ऋत्विजांस द्यावयाच्या दक्षिणा, दक्षिणायन व उत्तरायण असे ज्याचे दोन भाग आहेत तो संवत्सर म्हणजेच यज्ञ करण्याचे विशिष्ट काळ, यजमान म्हणजे यज्ञ करणारा आणि लोक म्हणजे ज्या लोकाला चंद्र पवित्र करतो तो चंद्रलोक व ज्याला सूर्य पवित्र करतो तो सूर्यलोक म्हणजे अज्ञान्याला मिळणारी धूमादि गति आणि आत्मज्ञाला मिळणारी अर्चिरादि गति हे सर्व त्या ब्रह्मापासूनच उत्पन्न झाले. ॥६॥ सर्व प्रकारचे देव म्हणजे मनुष्य समाजांतील अधिकारी, साध्य नांवांचे देव, मनुष्य, पशु, पक्षी, प्राण आणि अपान म्हणजे श्वास आणि उच्छ्वास, व्रीही आणि यव म्हणजेच खावयाचें अन्न, तपः म्हणजे विषयसुखांचा त्याग, श्रद्धा म्हणजे आत्मा आनंदरूप आहे आणि सर्व भूतांमध्ये एकच आत्मा आहे ह्यांवर दृढ विश्वास, सत्य म्हणजे सद्गुणांचें आचरण, वेदांचें अध्ययन [ब्रह्मचर्यम्] आणि वेदांतील आज्ञा [विधिः] हे सर्व त्यापासूनच उत्पन्न झाले. ॥७॥ सात प्राण म्हणजे (१) डोळे, (२) कान, (३) नाक, (४) रसनेंद्रिय, (५) त्वचा, (६) वागिंद्रिय आणि (७) मन हीं सात इंद्रियें, त्या सात इंद्रियांच्या सात शक्ति [अर्चिषः], त्या सात इंद्रियांचे सात विषय [समिधः] त्या इंद्रियांचे त्यांच्या त्यांच्या विषयांशीं होणारे सात प्रकारचे संयोग [होमाः], हीं सात इंद्रियें ज्यांत राहून आपला व्यापार करतात तीं हीं शरीरांतील सात ठिकाणें [लोकाः] आणि प्रत्येक इंद्रियाचीं सात ह्याप्रमाणे सात इंद्रियांचीं एकोणपन्नास [सप्त सप्त] गुहेंत ठेवलेलीं व राहणारीं ज्ञानें [गुहाशयाः] हीं सर्व त्या ब्रह्मापासूनच उत्पन्न झालीं. ॥८॥ सर्व समुद्र आणि पर्वत त्यापासूनच झाले. सर्व प्रकारच्या [सर्वरूपा] नद्या [सिंधवः] त्यामुळेच वाहतात [स्यंदंते]. सर्व प्रकारच्या औषधि आणि त्यांतील रस त्यापासूनच उत्पन्न झाला आणि त्या रसाच्या साधनानेच हा अंतरात्मा सर्व भूतांच्या ठिकाणीं राहतो. (अन्नरसामुळेच अंतरात्मा सर्वभूतांच्या ठिकाणीं जीवरूपाने प्रगट होतो असा भाव आहे). ॥९॥

टिप्पणें—अग्निः अग् कुटिलायां गतौ अशी एक धातु आहे. कुटिल गति म्हणजे वाटोळी गति. ह्या धातु-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पासून अग्नि म्हणजे वाटोळा फिरणारा म्हणजे द्युलोक असा शब्द होतो; कारण चंद्र, सूर्य, तारे जेथे राहतात तो द्युलोक एका दिवसांत एक वाटोळा पूर्ण फेरा करतो. चवथ्या श्लोकांतील "अग्नि"चा हा असा अर्थ आहे. पाचव्या श्लोकांतील "अग्नि"चा उष्णता देणारा किंवा उष्णता असाच मामुली अर्थ आहे.

"सोम म्हणजे हवेंतील पाण्याची वाफ, असा अर्थ घेणें आवश्यकच आहे. कारण तीच सूर्याच्या उष्णतेपासून उत्पन्न होते आणि तिच्यापासूनच पर्जन्य उत्पन्न होतो. ह्या पांचव्या श्लोकांतील वर्णनासारखेंच वर्णन छांदोग्योपनिषदांत ५।४–८ येथे आहे तें पहा.

"लोकाः सोमो यत्र पवते यत्र सूर्यः" म्हणजे छांदोग्योपनिषदांत ४।१५ व ५।१० येथील वर्णनांत सांगितलेल्या धूमादि आणि अर्चिरादि गति होत असें तेथील वर्णनावरून दिसतें. सूर्यलोक म्हणजे आत्मज्ञानाची जागृति आणि चंद्रलोक म्हणजे अज्ञाची जागृति असाहि अर्थ असेल.

"सप्तप्राणाः"—बृहदारण्यक ४।४।२ येथे जीं सात इंद्रियें सांगितलीं तींच हीं सात इंद्रियें होत. कारण हींच मुख्य इंद्रियें आहेत आणि हींच मृत्युकाळीं आत्म्याबरोबर जातात असें वर्णिलें आहे.

"गुहाशयाः निहिताः सप्त सप्त"—सात इंद्रियांचे जे सात विषय आहेत, त्या प्रत्येक विषयाचेहि सात प्रकार येथे मानले आहेत. डोळ्याच्या विषयाचे सात प्रकार म्हणजे सात रंग प्रसिद्धच आहेत. कानाच्या विषयाचे सात प्रकार म्हणजे सात स्वर प्रसिद्धच आहेत. ह्याप्रमाणे वागिंद्रियाचेहि सात स्वर होतात. जिव्हाविषयाचे सहा रस मानतात पण; ह्या उपनिषत्काराने सात मानले असें दिसतें. मधुराचे सारखेसारखे मधुर व गव्हासारखे मधुर असे दोन प्रकार करतां येतात. ह्याप्रमाणे इतर इंद्रियांचें समजावें. गंधाचे सात प्रकार सात रसाला अनुरूप असे मानतां येतात. स्पर्शाचे अत्युष्ण, ऊष्ण, सम, शीत, अतिशीत, मृदु व कठीण असे सात प्रकार मानतां येतील. मनाचे विषय इच्छा, द्वेष, सुख, दुःख, संशय, निर्णय आणि श्रद्धा म्हणजे प्रमाणांशिवाय (a priori) मानलेल्या गोष्टी हे सात आहेत. किंवा श्री. शंकराचार्यांप्रमाणे अर्थ करावा. गुहाशयाः हे "प्राणाः" ह्याचें विशेषण मानावें. "प्रत्येक प्राण्यांत सात सात ह्या प्रमाणे ठेवलेले गुहेंत म्हणजे शरीरांत राहणारे प्राण जेथे व्यापार करतात [चरंति] तीं ठिकाणें [लोकाः]" असा अर्थ तेव्हा होईल. ह्या अर्थांत द्विरुक्ति आहे. कारण "सप्त प्राणाः" हें पूर्वी म्हटलेलें आहेच. शिवाय "गुहा" हा शब्दहि शरीरवाचक नाही, तो शरीरांतील खोल भागांचा वाचक आहे. असें पुढच्याच श्लोकांत दिसतें. म्हणून आम्ही दुसरा अर्थ केला आहे.

मुंडक २, खंड १, श्लोक १०

पुरुष एवेदं विश्वं कर्म तपो ब्रह्म परामृतम् ।
एतद्यो वेद निहितं गुहायाम्
सोऽविद्याग्रंथि विकिरतीह सौम्य ॥१०॥

अर्थ—हा मनुष्यसमाज [विश्वं], त्यांत राहून केलें जाणारें सत्कर्म, तपः म्हणजे विषयानंदत्याग, वेदांमध्ये सांगितलेलें आत्मज्ञान [ब्रह्म] आणि त्यांमुळे अनुभवास येणारा परमानंद [परामृतम्] हे सर्व तो पुरुषच म्हणजे अक्षर ब्रह्मच होय. हें अक्षर ब्रह्मच आपल्या व इतर सर्वांच्या शरीराच्या अंतस्थ भागांत म्हणजे स्वतःच्या आत्म्यांतच [गुहायां] ठेवलेलें आहे असें जो जाणतो, तोच हे बाळा, अविद्याग्रंथि म्हणजे अविद्यारूपी गाठ सोडण्यास समर्थ होतो [विकिरति]. ॥१०॥

टिप्पणी—"ब्रह्म" म्हणजे वेद असा अर्थ होतोच त्यावरून लक्षणेने वेदांतील ज्ञान असा अर्थ घ्यावा. कारण कर्म आणि तपः ह्यांच्या पंक्तीमध्ये हाच अर्थ चांगला बसतो. "एतत्" म्हणजे, "ते अक्षर ब्रह्म" असा आम्ही अर्थ केला आहे. "परामृतम्" ह्याबद्दल तो शब्द घातला असेल असेंहि संभवतें. तसें मानल्यास द्वितीय श्लोकार्धाचा अर्थ "हा परमानंद आपल्या हृदयांतच आहे, बाहेरून कोठून येत नाही असें जो जाणतो तो अविद्याग्रंथि सोडण्यास समर्थ होतो" असा होईल. हाहि अर्थ चांगला आहे.

मुंडक २ खंड २

मुंडक २ खंड २ श्लोक १

आविः संनिहितं गुहाचरन्नाम
महत्पदमत्रैतत्समर्पितम् ।

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एजत्प्राणन्निमिषच्च यदेतज्जानथ सदसद्वरेण्यं
परं विज्ञानाद्यद्वरिष्ठं प्रजानाम् ॥१॥

अर्थ—ब्रह्माच्याच जवळ असणारे [संनिहितम्] गुहाचरन् नांवाचें [गुहाचरन्नाम] महत् हें पद म्हणजे पदवी ज्याला आहे असें हें आविष्कृत ब्रह्म [आविः] ह्या शरीरांत चांगल्या रीतीने ठेवलेले आहे. एजत् म्हणजे हालचाल म्हणजे क्रिया करणारें प्राणत् म्हणजे शरीरांतील प्राणक्रिया चालविणारे, निमिषित् म्हणजे डोळ्यांची उघडझाप करणारे म्हणजे आळीपाळीने जागृति व निद्रा ह्यांचा अनुभव घेणारे, बुद्धीच्याहि आंत असलेलें [विज्ञानात्परम्] ब्रह्मापासून झालेल्या सर्व वस्तूंमध्ये श्रेष्ठ [प्रजानां वरिष्ठ] अनाविष्कृत आणि आविष्कृत ब्रह्म ह्या दोहोंमध्ये जें वरेण्य म्हणजे अधिक मोठें आहे [सदसद्वरेण्यम्] असें जें तें आहे तें जाणून घ्या [जानथ].

टिप्पणे—मागील खंडांत अनाविष्कृत ब्रह्माचें "अप्राणः" "अमनाः" अशा प्रकारचें वर्णन करून त्यापासून सर्व जग कसें उत्पन्न झालें तें वर्णिलें. तेथील शेवटच्या श्लोकांत परमानंदहि ब्रह्मच आहे व तें ब्रह्म किंवा तो परमानंद गुहेंतच म्हणजे आत्म्यांतच आहे असें जाणल्याने अविद्येचा नाश होतो असें सांगितलें आहे. तो परमानंद जाणून त्याचा अनुभव कसा घ्यावा हें ह्या द्वितीय मुंडकाच्या द्वितीय खंडांत सांगावयाचें आहे. जीवावस्थेंतच परमानंदाचा अनुभव घेतां येतो व परमानंदाचें ज्ञान होतें म्हणून प्रथमतः जीवावस्थेचें महत्त्व ह्या पहिल्या श्लोकांत वर्णिलें आहे. जीव म्हणजे प्रकट झालेलें [आविष्कृत] ब्रह्मच होय हें लक्षांत ठेवल्यास ह्या व पुढच्या श्लोकाचा अर्थ चांगला समजेल.

"आविः" = व्याकृत झालेलें, आविष्कृत झालेलें, प्रकट झालेलें.

संनिहितम्—कठांत ३।१०-११ मध्ये किंवा ६।७-८ मध्ये ज्यांची परंपरा दिली आहे त्या इंद्रियें, मन, बुद्धि, आणि महत् ह्यांमध्ये महत् म्हणजेच जीव किंवा आविष्कृत ब्रह्म पुरुषाच्या म्हणजे अनाविष्कृत ब्रह्माच्या अगदी जवळ आहे म्हणून त्यास संनिहित हें विशेषण लावलें आहे.

महत्पदम्—कठांत ३।१०-११ आणि ६।७-८ जीवाला "महान्" म्हटलें आहे. म्हणून हें विशेषण योग्यच आहे. "प्रजानां वरिष्ठं" म्हणजे "ब्रह्मापासून उत्पन्न झालेल्या वस्तूंमध्ये श्रेष्ठ" असा अर्थ स्पष्ट आहे. पण हें विशेषण आविष्कृत ब्रह्मास म्हणजे जीवासच लागूं शकतें अनाविष्कृत ब्रह्मास लागूं शकत नाही. म्हणून हें ह्या श्लोकांतील वर्णन जीवाचेंच आहे असें ठरतें व ह्या जीवासच जाणण्यास ह्या श्लोकांत सांगितलें व ह्या जीवाचीच उपासना करण्यास पुढच्या श्लोकांत सांगितलें असें ठरतें. पण हें श्री शंकराचार्यांस अनिष्ट वाटतें म्हणून त्यांनी "प्रजानाम्" ह्याचा संबंध "विज्ञानात्" ह्या शब्दाशीं जोडला आणि "प्रजानाम् विज्ञानात्परं वरिष्ठं च" असा अन्वय केला आणि "लोकांच्या ज्ञानाला अगम्य आणि श्रेष्ठ" असा अर्थ केला. परंतु "प्रजानां" ह्याचा संबंध "विज्ञानात्" ह्याशीं जोडणें चूक आहे. कारण त्या दोहोंमध्ये "वरिष्ठम्" हें पद आडवें आहे आणि "प्रजानाम्" ह्याचा संबंध जवळच्या "वरिष्ठं" ह्या पदाशीं जोडल्यानेहि अर्थ निष्पन्न होतो. श्री शंकराचार्य म्हणतात "परं व्यतिरिक्तं विज्ञानात्प्रजानामिति व्यवहितेन संबंधो यल्लौकिकविज्ञानागोचरमित्यर्थः" ह्यांत "प्रजानां" ह्याचा संबंध दूरच्या पदाशीं जोडला ही गोष्ट श्री शंकराचार्यांनी मान्य केली आहे. ज्यांचा संबंध जवळच्या पदाशीं जुळूं शकतो त्याचा संबंध दूरच्या म्हणजे व्यवहित पदाशीं जोडणें चूक आहे. "लोकांच्या ज्ञानाला अगम्य" असा जो अर्थ श्री शंकराचार्य करतात तोहि योग्य नाही कारण "दृश्यतेत्वग्र्यया बुद्ध्या" असें कठांत स्पष्टच सांगितलें आहे (कठ ३।१२) लौकिक म्हणजे अशास्त्रीय असा त्यांचा अर्थ असेल तर तो "प्रजानाम् विज्ञानात्" ह्यांतून निघत नाहीं. "मनुष्याच्या ज्ञानाला म्हणजेच बुद्धीला अगम्य" असाच अर्थ त्यांतून निघेल व तो अग्राह्य आहे. पुढील सातव्या श्लोकांत "मनोमयः" हें विशेषण आहे आणि पहिल्या खंडांतील दुसऱ्या श्लोकांत उलटें "अमनाः" हें विशेषण आहे. अर्थात् दोनहि ठिकाणचीं विशेष्यें एकच आहेत असें मानणें योग्य नाही. म्हणून पहिल्या खंडांत अनाविष्कृत ब्रह्माचें वर्णन आहे आणि दुसऱ्या खंडांत आविष्कृत ब्रह्माचें म्हणजे जीवाचें वर्णन आहे असें मानूनच ह्या दुसऱ्या खंडांतील सर्व श्लोकांचे अर्थ लाविले पाहिजेत.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्यास दुसरेंहि महत्त्वाचें प्रमाण पुढील सातव्या श्लोकांतच आहे. तेथील "यस्यैष महिमा भुवि" हें वर्णन अक्षर ब्रह्मास लागत नाही, जीवासच लागतें. कारण अक्षर ब्रह्माचा महिमा सर्वत्रच दिसतो, पृथ्वीवरच दिसतो असें नाही. फक्त पृथ्वीवरच जीवाचा महिमा घरें, पूल, शहरें, रस्ते, शेतें, ह्या रूपानें दिसतो.

जीवस्थितींतच आनंदाचा अनुभव येऊं शकतो म्हणून ह्या खंडांत जीवोपासनाच सांगितली आहे व जीवाचेंच वर्णन केलें आहे असें मानलें पाहिजे. येथील वर्णन जीवाकडे सरळपणेंच लागतेंहि.

"सदसद्वरेण्यं" = सदसतोः वरेण्यम् म्हणजे सत् व असत् ह्या दोहोंमध्ये वरेण्य (वरचढ). सदसत्; म्हणजे व्याकृत व अव्याकृत असा अर्थ आहे असें तैत्तिरीयोपनिषद् २।७ ह्यावरून दिसतें. तेथेहि हेच शब्द आहेत व तेथे त्यांचा व्याकृत व अव्याकृत ह्याहून दुसरा अर्थ करतांच येत नाही. श्री शंकराचार्यांनीहि तेथे तोच अर्थ केला आहे. तर मग येथे त्यांचा अर्थ स्थूलसूक्ष्म असा करणें अयोग्य आहे कारण तेथे ते शब्द जसे ब्रह्माच्या वर्णनाकरिता योजले आहेत तसेच येथेहि ते कोणत्या तरी प्रकारच्या ब्रह्माच्या वर्णनाकरिताच योजले आहेत. आता व्याकृत आणि अव्याकृत ह्या दोहोंमध्ये वरेण्य कोणतें ह्या प्रश्नाचें उत्तर व्याकृतच वरेण्य असेंच द्यावें लागेल. बी हें अव्याकृत रूप आणि त्यापासून उत्पन्न झालेलें फूल किंवा फळ हें व्याकृत रूप ह्या दोहोंमध्ये फूल किंवा फळ हेंच अधिक चांगलें तसेंच तें आहे. अर्थात् सदसद्वरेण्य हें व्याकृत ब्रह्माचें म्हणजे जीवाचेंच विशेषण होऊं शकते. तैत्तिरीय उपनिषदांत २।७ येथेहि व्याकृतालाच सुकृत म्हणजे चांगला बनविलेला असें विशेषण लाविलें आहे त्यावरूनहि व्याकृतच अधिक चांगलें असें तेथे दाखविलें गेलें आहे.

"गुहाचरत्" कठ ३।१०-११ येथे जी गुहा वर्णिली आहे तीच येथेंहि निर्दिष्ट आहे.

"परंविज्ञानात्"—कठ ३।१०-११ येथील "बुद्धेरात्मा महान् परः" ह्यांत जो अर्थ आहे तोच "परं विज्ञानात्" ह्याचा आहे. "विज्ञान" हा शब्द "बुद्धि" ह्या अर्थानें कठ ३।५-९ येथे योजलेला आहेच.

"निमिषत्"—झोपेंत डोळे बंद होतात आणि जागृतींत उघडे असतात. ह्यावरून "निमिषत्" ह्याचा अर्थ आळीपाळीने निद्रा व जागृति अनुभवणारा असा होतो.

मराठवाड्यांतील एकमेव मराठी मासिक
मराठवाडा साहित्य परिषदेचें मुखपत्र

प्रतिष्ठान

दर महिन्याच्या १ तारखेस प्रसिद्ध होतें
समीक्षा, ललित, काव्य, संशोधन इत्यादि
विषयांवरील मौलिक साहित्य

आजच वर्गणीदार व्हा

वार्षिक वर्गणी रु. ५ किरकोळ अंक ८ आ.
जाहिराती स्वीकारल्या जातात
मराठवाड्याबाहेर एजन्सी देणें आहे. लिहा.

"प्रतिष्ठान" कार्यालय,
इसामिया बाजार,
हैदराबाद-दक्षिण.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राचीन विदर्भाचें काव्य

श्री. नारायण नागोराव हूड

(लेखांक १ ला)

राजशेखरने आपल्या बालरामायण या नाटकांत श्रीरामचंद्राच्या मुखांतून विदर्भाला ' सारस्वती जन्मभू ' असें प्रशस्तिपत्रक देवविलें आहे. वैदिक कालापासून आजपर्यंत विदर्भांत, वैदिक, संस्कृत, प्राकृत, महानुभावीय, संतवाङ्मय, लोकवाङ्मय इत्यादि क्षेत्रांत एवढी विपुल काव्यरचना झाली आहे की, तिला एखाद्या महासागराचीच उपमा साजेल! उपरोक्त काव्यासंबंधी मी लिहिलेल्या एका दीर्घ प्रबंधांतून, येथे तीन लेखांकांत त्या काव्याचा परामर्ष घेण्याचें ठरविलें आहे. सुरवातीला, काव्यासंबंधी साधारणतः कोणत्या मुख्य गोष्टी लक्षांत ठेवावयास पाहिजेत व कोणत्या दृष्टिकोनांतून वरील काव्याचा परामर्ष घ्यावयाचा योजलें आहे, हें विशद करून, कांही वादग्रस्त मुद्दे वाचकांसमोर विचारार्थ ठेवावयाचे आहेत. उपरोक्त काव्याच्या एकदोन वैशिष्टयांविषयीं त्रोटक दिग्दर्शन व विदर्भीय काव्याचें जें एकमेव वैशिष्टय–आध्यात्म–त्यासंबंधीचें जरासें विस्तृत समालोचन एवढीच या लेखमालेची मर्यादा आहे.

काव्याची अनास्था

स्वतःच्या नाभींत असलेल्या कस्तुरीची ज्याप्रमाणे कस्तुरी मृगाला कल्पना नसावी त्याचप्रमाणे काव्याच्या बाबतींत जनतेची कांहीशी स्थिति असते. शहराशहरांतील वा खेड्याखेड्यांतील आजकालचे विचारप्रवाह पाहिले असतां, ते बहुधा व्यवहारसंबंधीच असतात. कांही कवी, कांही रसिक, महाविद्यालयांतील प्राध्यापक वर्ग व विद्यार्थी याशिवाय काव्यामध्ये साधारणतः लक्ष घालणारे थोडेच सापडतात. साधारणतः तेराव्या शतकापासूनच्या काव्याचा कांही सुशिक्षितांस साधारणतः परिचय असतो. मासिकांतील काव्यें अधूनमधून शोभेच्या महिरापीचें कार्य करीत असतात; कांही वर्तमानपत्राचे रकाने (कांही अपवाद सोडून), राजकारणांतील व दैनंदिन लहान सहान घटनांनी व्याप्त झालेले दिसतात. रेडिओवरून सकाळीं कांही उत्कृष्ट भक्तिगीतें ऐकावयास मिळतात, व काव्यदर्शनांत कधी कधी थोड्याबहुत चांगल्या कविताहि आस्वादावयास मिळतात. तरी पण बहुतेक सर्वांची (सुशिक्षितांची सुद्धा) ओढ बहुशः अगदी निकृष्ट दर्जाच्या भावगीतां(!) कडेच असते. ही काव्याची अनास्था पाहिली म्हणजे ज्या काव्यधनाबद्दल विदर्भीय कवींनी अक्षरशः फकिरी स्विकारली, व काव्याचा आनंद स्वतः जन्मभर अखंड लुटून दुसऱ्यांना देण्याचा प्रयत्न केला त्या कविवरांची काव्यसाधना फुकट तर गेली नाहीना, असा एखादेवेळीं मनांत विचार येतो. पण काव्य हाच कोणत्याहि वाङ्मयांतील अक्षर स्वरूपाचा लेखनप्रकार असल्यामुळे त्यासंबंधीची अभिरुची वाढविण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर होणें अवश्य आहे.

चंदेरी किनार

आर्यांची, प्रथम वसाहत (दक्षिणेंत) विदर्भांत झाली असें कांही विद्वानांचें मत आहे. तेव्हापासून काव्यरचना विदर्भांत उपलब्ध आहे. ऋग्वेदांत अगस्ति ऋषीचे कांही मंत्र असल्यामुळे, हें सहज सिद्ध होतें की, विदर्भांतील आर्यांच्या वसाहतीनंतर देखील ऋग्वेदीय मंत्रांची रचना सुरू होती. कोणतें काव्य विदर्भांत लिहिल्या गेलें हें नक्की ठरवितां येत नसलें, तरी रामायण महाभारत कालापूर्वीपासून विदर्भांत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काव्यरचना होत असली पाहिजे असा कयास बांधतां येतो.

ऋग्वेदांत फार उत्कृष्ट काव्य आहे, याबद्दल शंकाच नाही ! कांही पाश्चात्य पंडित मात्र ऋग्वेदांत विशेष काव्य नाही या मताचे आहेत. इतिहासाच्या दृष्टीने तीं सूक्तें कितीहि महत्त्वाचीं असलीं तरी तीं यज्ञाच्या वेळीं पुरोहितांनी वगैरे देवदेवतांस उद्देशून रचलेलीं स्तोत्रें आहेत, असें त्यांचें म्हणणें दिसतें. वेदामध्ये राष्ट्रीय दृष्टीची कविता भरपूर आहे हें,

सहस्रं सा कमर्चंत
परिष्ठोभत विशेति:
शतैवमन्वानोनवु:
इंद्राय ब्रम्होद्यतम्
अर्चन्ननु स्वराज्यम् (ऋ. १-८०-९)

भावार्थ:—हजारो लोकांनी जमून ईश्वराची स्तुति करावी...शेकडो लोकांनी एकत्र जमून त्याची उपासना करावी. असें केल्याने शत्रुनिर्दालन करणाऱ्या वीराला ज्ञान्यांचें सहाय्य होतें. हेंच स्वराज्याची अर्चना करणाऱ्याला आवश्यक आहे.) या व भारताची राष्ट्रभाषा, मातृभूमि, भारतीय संस्कृति या तीन उपास्य देवता (ऋ. ७-२-८), वीर पुरुषांची मागणी (ऋ. ७-२-९), बलवान व दक्ष अशा नेत्यांची प्रशंसा (ऋ. ७-२-३), वीरांच्या कार्याची प्रशंसा (ऋ. ७-६-२), पराक्रमी पुत्र होवोत (ऋ. ७-१-२४), पुरुषार्थी वीर (ऋ. ७-६-१), स्वराज्यामध्ये अभ्युदयाकरता प्रयत्न (ऋ. ५-६६-६), मातृभूमीच्या हिताकरता प्रयत्न (अथर्व १२-१-६२), एकात्मता वाढविणारें व्यावहारिक ज्ञान (अथर्व ३-३०-४) इत्यादि अनेक प्रकारच्या वेदमंत्रांवरून दिसून येतें.

पण वेदांतील हें काव्य द्रष्टया ऋषींच्या मुखांतून बाहेर पडलें असलें तरी तें बहुधा बुद्धीला स्तिमित करतें तें त्याच्या चंड प्रचंडत्वामुळे ! सातशें सोमरसांची तळीं पिऊन लढाईवर जाणारा इंद्र सपाट शिखरें असलेल्या पर्वताच्या 'भरित्रा'वर (पाटचावर) दुसऱ्या पर्वतवरवंटयाने ठेंचला जाणारा, व खोल गिरिगव्हरांत शेकडो मैल फेसाळत जाणारा, ब्रह्महृदयं ताऱ्याप्रमाणे चमकणारा सोमरस, अग्नीचें अंतरिक्षाला भिडणारे तिग्मशृंग, सौदामिनीच्या हास्यांतून प्रकट होणारे मरुद्गण या वर्णनांनी छोटयाशा आकाराच्या व क्षुद्र शक्तीच्या माणसाला अद्भुततेचा आनंद मिळतो, पण भावनांचा ओलावा कमी वाटत असल्यामुळे तें काव्य, काव्याचें परमोच्च ध्येय गाठूं शकत नाही.

दुसरें वेदांतील काव्य कांहीसें भक्तिमात्रतेंतून निर्माण झालेलें असलें, तरी ती भक्ति निरपेक्ष मात्र नाही, हें

वि मृळीकाय ते मनोरथीरश्वं न संदितं
गीर्भिर्वरुण सीमहि ।१।२५

(भावार्थ—हे वरुणा ! ज्याप्रमाणे रथी दूर चालत आल्यामुळे श्रांत झालेल्या घोडयाला घास दाणा देऊन प्रसन्न राखतो, त्याप्रमाणे आम्ही तुझें मन आमच्या सुखाकरता (आम्ही केलेल्या) स्तोत्रांनी आपल्याकडे खेचून आणतों, या किंवा

यदंग दाशुषे त्वमग्ने भद्रं करिष्यसि ।
तवेत्तत्सत्यमंगिरः ।१।६

(हे अंगिरा अग्ने, हवि अर्पण करणाऱ्या यजमानाचें जें तूं कल्याण करण्याचें मनांत आणशील, तें होणारच !) इत्यादि अनेक स्तोत्रांवरून दिसून येतें. कित्येक ठिकाणीं याचना वृत्तीनें हीं काव्यें लिहिलेलीं दिसून येतात. निरपेक्ष भक्तीतून जें काव्य निर्माण झालें नाही तें काव्याचें अंतिम शिखर गाठूं शकत नाही. मेघाला असलेल्या तेजोमय चंदेरी किनारीप्रमाणें तीं काव्यें कल्पनांनी दीप्तिमान असतील (आणि उषेची वगैरे स्तोत्रें तशीं आहेतच) पण त्याचवेळीं भावना—भक्ति जलाच्या आर्द्रतेच्या कमीपणामुळे, तीं काव्यें साखरेने जसें पाण्यांत विरघळून जावें, त्याप्रमाणे रसिकांच्या मनाची तन्मय वृत्ति करण्यास असमर्थ असतात. तसेंच वेदांतील बरेचसें काव्य हें व्यावहारिक मूर्त तत्वावर आधारलेलें असल्यामुळे एका दृष्टीने, तें अमूर्तावर आधारलेल्या संतकाव्याची बरोबरी करूं शकणार नाही.

'रावणवहो'

विदर्भातील, पहिल्या शतकांतला, नांव घेण्यासारखा काव्यग्रंथ म्हणजे 'हालाची सप्तसति' हा होय.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निसर्गाच्या पार्श्वभूमीवर नवथर प्रणयी भावनांचीं अवखळ चित्रें यांत इतक्या विपुलतेने व कुशलतेने रेखाटलेलीं आढळून येतात की, त्यांतील संख्या व रस कधीच कमी होऊं शकत नाही. म्हणूनच उपोतन पुरीने

पणईहि कइयणेण य भमरेहि जस्स जायपणएहि ।
कमलायरो व्व कोसो विलुप्पमाणो विहु न झीणो ।

असें, या काव्यग्रंथाविषयी यथार्थतेने म्हटलेलें आहे.

विदर्भांत निर्माण झालेला, चवथ्या शतकांतील महत्त्वाचा काव्यग्रंथ म्हणजे वाकाटक वंशीय राजा प्रवरसेन (द्वितीय) याने लिहिलेल्या सेतुबंध हा काव्य-ग्रंथ होय. हा 'रावणवहो' या नांवानेहि ओळखला जातो. या ग्रंथावर खुद्द कालिदासाने संस्करण केलें, असें कांही विद्वानांचें मत असून, बाण व दंडी यांच्या-सारख्या कविश्रेष्ठांनी अनुक्रमे आपल्या हर्षचरितांत व 'काव्यादर्श' या अलंकार ग्रंथांत सूक्तिरत्नांचा हार म्हणून गौरविलें आहे, यावरून त्या ग्रंथाच्या योग्यते-विषयी निराळें लिहावयास नको.

करुणरसाची आसावरी आळविणारा भवभूति 'भारवेरर्थगौरवम्' असें बिरुद मिळविलेला भारवि, अंतरंगांतील उभड-उमाळे स्वतःच्या अंगांतील रक्ताने चित्रित करणारा गुणाढ्य, पदलालित्याचा प्रभु दण्डि हे, 'नास्ति येषां यशः काये जरामरणजं भयम्' असे विदर्भाचेच रससिद्ध संस्कृत कवी होत. गुणाढ्याच्या बृहत्कथेच्या आधारें भासाने आपलीं कांही नाटकें रचलीं. व कालिदासाने आपल्या मालविकाग्निमित्राचें कथानक, बृहत्कथाग्रंथांतून घेतलेलें आहे यावरून गुणाढ्याची योग्यता कळून येईल. या कवींच्या निर-निराळ्या कलात्मक वैशिष्ट्यांनी नटलेल्या काव्यांनी विदर्भभूमी समृद्ध झालेली आहे.

नायकुमारचरिउ

दहाव्या शतकांतील एक महत्वाचें अपभ्रंश भाषेंतील काव्य 'नायकुमारचरिउ' हें अत्यंत उल्लेख-नीय असून, त्यांत काव्यसतारीच्या पहिल्या शृंगार-तारेंतून रसराजाचा पंचम छेडणाऱ्या पुष्पदंत कवीची कलाकुसर प्रत्ययास येते. हें काव्य डॉ. हिरालाल जैन यांनी संपादित व प्रकाशित केलेलें आहे. जैनांच्या प्राचीन काव्यभंडारांतील तें एक उज्वल काव्यरत्न आहे. नायकुमार हा या काव्याचा नायक असून, चोवीस कामदेवांपैकी एक आहे असें जैन मानतात. या काव्यांत अलंकारांची बरीच रेलचेल आहे. अनेक तरल शृंगारात्मक भावनांनी व चित्रमय सौंदर्यानेहि हें काव्य भरगच्च आहे. त्यांपैकी एकच उदाहरण उद्धृत करतों.

त्रिभुवनरति ही काश्मीरच्या नंदराजाची कन्या असून तिने आपल्या विवाहाकरता असा पण लावला होता की, तिला वीणावादनांत जो हरवील त्याला ती माळ घालील. नागकाने एके दिवशीं पांचशें वीणा-वादक रस्त्याने जातांना पाहिले. त्यांचेकडून त्याला असें कळलें की, ते स्वतः वीणावादनांत त्रिभुवनरती-कडून पराभूत होऊन आलेले आहेत. त्यामुळे नागक हा आपल्या अनुयायांसह काश्मीरला गेला. त्यावेळीं प्रथम भेटीमध्येच अनुरक्त होऊन, वीणावादनांत लट-पटून, पराभूत होणाऱ्या त्रिभुवनरतीचे—

अण्णुहि दिणि ईसीसि हसंतें
पुच्छिउ णंदु मणोहरिकंतें
पुत्ति महारी उत्वसि मीणइ
वीणावज्जु चारु परियाणहि
जामहिं आलावणि आलावइ
तामइं जिणमुणिहिं विणुरावइ
तां दुःखलिउ मुद्धहे णरवरु
णं कामेघनु गुणसंधियसरु
पियविरहेमणु दुक्खइ दुक्खइ
सुट्ठु मुहुल्लहु सुक्कइ सुक्कइ
अंगु अणंगे तप्पइ तप्पइ
दंसणे रइजलु छिप्पइ छिप्पई
वल्लहु गुणकहु जंपइ जंपई
अण्ण कहंतरे कुप्पइ कुप्पइ
घत्ता—जयुराएयं तंतिहिं दिण्णुकरु
वीणासरु णावहि कसुमसरु···

(भावार्थ : तिच्या वीणावादनाने 'जिणमुणि'हि कसा मोहित (रंजित—आनंदित) होत होता; प्रिय—विरहाने ती कशी दुःख पावत होती, त्या विचा-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राने कशी सुकून गेली होती, अंगाअंगांत अनंगबाधा होऊन कशी तापत होती, वल्लभाचे गुण कशी जपत होती इतरांचे गुण सांगतांच कशी कुपित होत होती आणि नागकुमाराने वीणेवर हात ठेवतांच तिची कशी अवस्था झाली··) हें सूक्ष्म यथातथ्य भावचित्र कुणाला हृद्य वाटणार नाही ?

त्याचप्रमाणे राजगृहांतील स्त्रिया जिणमुनीच्या दर्शनाला जात असल्याचें, राजाच्या अंतःपुरांतील स्त्रिया घेऊन उद्यानांत जाण्याचें, नागकुमाराचा जल-विहार इत्यादि विविध प्रसंग या काव्यांत वर्णिलेले आहेत. मात्र या दीर्घ काव्यांतील प्रसंगांत एकसूत्रता फारशी नसून ते कोणीकडच्या कोणीकडेच वहात गेलेले दिसतात व त्यांचा एकच एक ठसा (single impression) मनावर उमटत नाही, हें एक काव्यांतील वैगुण्य दिसतें.

यानंतर बारातेराव्या शतकापासूनचे महानु-भावीय व संतकवी यांचे कालखंड येतात. पहिल्यांत शृंगाररसाच्या द्राक्षांचे हिरवे मळे फुलविणाऱ्या भास्करभट्ट वोरीकराचें (आध्यात्मिक विषयास सोडून लिहिलेलें) मराठी भाषेंतील जवळजवळ पहिलें ललित काव्य नजरेस येतें.

विदर्भांतील कला–काव्यांचा त्रोटक परिचय घेतल्यानंतर त्यांतील आध्यात्माच्या फुलामंजिऱ्यांनी भरून आलेल्या सत्काव्यांच्या कल्पलतांकडे सहजच दृष्टि जाते. विशेषतः या प्रकारच्या काव्यांचें रसग्रहण करण्याकरतां एक विशिष्ट दृष्टि ठेवावयास पाहिजे.

बोलाआधी झोंबे प्रमेयासी !

काव्याचें परीक्षण करीत असतां कवींचा काळ ठरविणें, कोणत्या कवीच्या काव्याचा कोणत्या कवीच्या काव्यावर कसा व कितपत परिणाम झाला आहे, अमुक कवि एक की दोन, कोणत्या काव्यांत किती उपमा अलंकार आहेत याची मोजदाद करणें इत्यादि अवांतर गोष्टींवर वाजवी पेक्षा जास्त भर दिला जातो ! 'जे शब्दाआधि झोंबे प्रमेयासी,' 'दिव्य भोगाच्या खाणी कशि वदेल राठ वैखरी ग' इत्यादि प्रकारचीं काव्यें अलंकार वगैरेंच्या पलिकडील आहेत. वरील गोष्टी जरूरीच्या आहेतच, पण मधुकरी वृत्तीने काव्याचे अंतरंगांत शिरून त्याचा मनमुराद आनंद लुटणें हेंच काव्याचें खरें रसग्रहण होय.

मराठी काव्यांत आता समीक्षेची सूक्ष्म रसग्राही पद्धति सुरू झाली हें खरें; पण तिची अजून सुरवातच आहे. माझे मित्र श्री. वा. ना. देशपांडे यांनी त्यांच्या विशिष्ट टीका पद्धतीने काव्यक्षेत्रांतील असंख्य उत्कृष्ट मुद्दे आतापर्यंत चर्चिले आहेत, एवढे मात्र त्यांना न कळतच येथे नमूद करून ठेवतों !

प्रतिभेचे अमर उन्मेष

गेल्या पांचसहा वर्षांपासून व तत्पूर्वीहि मनांत बीजरूपाने वसत असलेल्या दोन विषयांवरील काव्याची रूपरेषा मी लिहून ठेवलेली आहे. ही काव्यें लिहीत असतांना काव्याविषयी माझीं कांही मतें निश्चित झालेलीं आहेत आणि त्याच कांही मतांनुसार मी प्राचीन विदर्भीय काव्याचें मूल्यमापन करीत आहे. त्या काव्यासंबंधी येथे ओझरता उल्लेख करणें अस्थानीं होणार नाही.

पहिल्या काव्याचा विषय जवळ जवळ बारा हजार ओळींचा असून त्यांतील बराचसा भाग 'आदि-शक्ति'ला उद्देशून लिहिलेला आहे. तें सौंदर्य मूल्यावर आधारलेलें, नवीन दृष्टिकोणांतून व नवीन पद्धतीनें लिहिलेलें आहे. त्यांत 'Eternal Devotion' व Eternal Beauty या संबंधीच्या कांही कल्पना-व्यक्त झालेल्या आहेत. तसेंच सौंदर्यशास्त्रावरील अनेक मूलगामी सिद्धांत व कांही तत्वज्ञानात्मक भागहि त्यांत आला आहे. दुसरें काव्य 'नवा प्रकाश' याचा विषय सुमारें सात हजार ओळींचा असून त्यांत तत्व-ज्ञानाच्या क्षेत्रांत येणाऱ्या बहुतेक सर्व विषयांचा परामर्ष नवीन दृष्टिकोणांतून घेतला असून त्यांत शाश्वत सत्या (Eternal Truth) संबंधीचे कांही सिद्धांत सांगितलेले आहेत. तसेच पाश्चात्य व पौर्वात्य तत्व-ज्ञानांतील कांही सिद्धांत बरोबर कसे नाहीत, हें विस्तृत दाखविलें आहे. वरील दोन्ही काव्यांतील कांही भाग इंग्रजी रूपांतरहि केलेलें आहे. या दोन्ही काव्यात

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संस्करण वगैरे होऊन ती पुरी व्हावयास बराच कालावधी लागेल.

त्यांपैकी प्रथम पहिल्या तीन परिच्छेदांतील (सुरुवातीच्या परिचयात्मक) मतें उद्धृत करतों. 'कविता म्हणजे' या परिच्छेदांत कविता हें घोर तप आहे; कविता म्हणजे फकिरी; सर्वस्वाचा त्याग, समाधींत गुंगणें म्हणजे कविता; अनुभव येणे व अनुभव देणे याचें नांव कविता. कविता म्हणजे चिरंतनाचें सौंदर्याचें दर्शन घेणें; कविता म्हणजे निर्मळ बनणे, कविता म्हणजे विराटव्यापी प्रीति करणें; गाद्यागिर्द्यावर लोळून रणांगणावर काव्यें करणें, यांचें नांव न कविता! हें सांगितलेले आहे.

'रे कूपा' या परिच्छेदांत काव्य-स्फूर्ति, खरें ज्ञान अंतरांतच असतें, तें बाहेरून येत नाही हें ओढयाच्या रूपकानें सांगितलें आहे. तो म्हणतो:—

प्रतिवर्षी वर्षाकालीं पाण्याच्या मुसळधार धारा कोसळत होत्या, आणि मी पाण्याने साराच भरून जात होतों. त्यामुळे माझ्या मनांत काठोकाठ अहंकार भरून जात होता. माझ्या बाह्य ऐश्वर्यानें सारी जनता चकित-थकित होत होती. दर्दुर मिषाने मी वेद, उपनिषदें, ऋचा पठण करीत होतों. माझें ज्ञानावडंबर पाहून लोक मला समजत होते कुणी ज्ञाता-प्रज्ञाता! माझें पाणी गढूळ, काषाय रंगाचें असून मी झाडीझुडपांना पुष्पवेलींना तुडवीत जात होतों. माझें झगझगीत पाणी पाहून त्यावर असंख्य कीटक झेंप घालीत होते. तें पिऊन व ज्ञानलवदुर्विदग्ध बनून जगांत फिरत होते. तें वरवरचें पाणी पिऊन कोणीच तृप्त झाला नाही! पण वर्षा निघून जाताच माझ्या तनूचा सारा खडकच राहत होता; मजमध्येच जल नव्हतें तर मी दुसऱ्याला कसा देऊं शकणार?

पण एक दिवस अकस्मात तुझ्या-भक्तींतून निर्माण झालेल्या प्रतिभेचा-मला स्पर्श झाला आणि नवल वर्तलें! खुद्द माझ्या खडकहृदयांतच नवीन प्रकाशरूप झरा उत्पन्न झाला—

आणि मग तो पूर्वीचा अहंकार पार नाहीसा झाला. तो प्रवाह मदांध काषाय रंगाचा नव्हता, तर झुळझुळ असा स्फटिकासारखा होता. जनता माझ्या प्रवाहानें चकित-थकित होत नव्हती; तर त्यांतील जल पिऊन तृप्ति पावत होती. वृक्षलता, पुष्पें वगैरे माझें पाणी पिऊन आनंदानें नाचत होत्या. तो झरा माझ्या हृदयांतच होता-पण तो तुझ्या (प्रतिभेच्या) दिव्यत्वाच्या कराचा स्पर्श होण्याची वाट पहात होता. हे झऱ्या! (तो स्वतःस म्हणतो) आतापर्यंत तुझा सारा प्रकाश उसना होता-अवसान उसनें होतें-व तुला कोणाला कांही सांगण्याचा अधिकार नव्हता. आता अंतरीचा प्रकाश प्रज्वलीत झाल्यामुळे, ज्योति ज्योति प्रकाशानें उज्वलित कर. शिशिर, वर्षा जाऊन आता ग्रीष्म आला तरी तूं तुंडुब भरलेंला असून जगतास स्वच्छ असे जल (ज्ञान) देतोस.

तिसऱ्या परिच्छेदांत प्रीतीनें ब्रह्मांडाचें गूढ उकलतें; पराकोटीची उत्कटता हाच प्रीतीचा प्राण असतो; प्रीतीमुळे निर्माण झालेल्या अखंड ध्यासांतून अमर काव्यें बाहेर पडतात; तर्ककठोरांना, बुद्धिमतांना, ब्रह्मांडाच्या ज्या गूढांचा लवलेशहि दिसत नाही, तें गूढ प्रीतिकर केवळ आपल्या प्रीतीनेच पहात असतात. येथे प्रीति हा शब्द 'भक्ति' या अर्थानें वापरलेला आहे. आजकाल भक्ति व भक्त या शब्दांना बावळटपणाचा शिक्का बसलेला आहे. भक्ति व भक्ताचा अधिकार पुढे थोडासा वर्णन केलेलाच आहे. आध्यात्मांतील बरेच शब्द हास्यास्पद होत आहेत व या शब्दांना सांप्रदायिकत्व चिकटू पहात आहे! भक्तीपुढे सारें ज्ञान हात जोडून उभें राहतें. नास्तिकवादाला, संशयवादाला भक्तीमध्ये स्थान नाही. भक्ति म्हणजे आनंद आहे व खऱ्या काव्याचा जन्म आनंदांतूनच होत असतो. ज्ञानेश्वरानें 'कांतु' म्हणून, नामदेवानें 'वेडी स्त्री' म्हणून, रामकृष्ण परमहंसानें 'राधा' असें स्वतःस समजून परमेश्वरावर प्रीति-भक्ति कशी केली, याचें विवरण पुढे केलेलें आहे.

अभिनव गुप्तानें प्रतिभेची व्याख्या 'अपूर्व वस्तुनिष्ठा प्रज्ञा' व 'अपूर्व निर्माणक्षमा प्रज्ञा' अशी केली आहे. 'अपूर्व वस्तुनिष्ठा प्रज्ञा' म्हणजेच त्या विषयाशीं भक्तीमुळे झालेले व्यक्तीच्या मनाचें अखंड तन्मयीभवन. व तें झाल्यावर आपल्या निर्माणक्षम प्रज्ञेनें तें साकार करणें म्हणजे काव्य.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वरील तीन परिच्छेदांवरून हृदयांतील अखंड भक्तीच्या आनंदांतून, फुललेल्या प्रकाशाने (प्रतिभेने) टाकलेले अमर उन्मेष म्हणजेच खरें काव्य असें म्हणता येईल. पंडितीवृत्तींतून खरें काव्य निर्माण होण्याचा संभव कमी आहे.

प्राचीन विदर्भाच्या काव्यांत भक्तीच प्रामुख्याने भरून राहिल्यामुळे भक्तीच्या स्वरूपाविषयीं थोडें जास्त विवेचन करावयास पाहिजे.

काव्याचें मूळ

केवळ आध्यात्मिक किंवा तात्त्विक वा अमूर्तासंबंधी काव्य लिहिण्याकरतांच भक्ति पाहिजे असे नसून कोणत्याहि प्रकारचें काव्य असलें तरी त्याच्या मुळाशीं भक्तीच असावी लागते. येथे भक्ति हा शब्द प्रचारकी अर्थाने वापरलेला नाही. भक्तींतून साऱ्या काव्याचा जन्म आहे. शृंगारात्मक काव्य लिहावयाचें झाल्यास प्रेमविषयीभूत व्यक्तीवर प्रीति–किंवा भक्ति असल्याखेरीज तें लिहितांच येणार नाही ! समाजावर कविता लिहावयाची तरी समाजाविषयी जिव्हाळा व भक्ति पाहिजे. राष्ट्रावर (वीररसाची वगैरे) कविता लिहावयाची झाली तरी, राष्ट्रावरील भक्तीशिवाय मात्र ती होणार नाही. सृष्टिसौंदर्याच्या काव्याच्या मुळाशीं सृष्टीवर भक्तीच पाहिजे. म्हणजे तो विषय कवीच्या आनंदाचें स्थान व्हावयास पाहिजे. भक्तींतूनच आनंदाची निर्मिति आहे. करुण रसाची कविता लिहावयाची झाल्यास त्याहि वस्तूवरील भक्ति किंवा प्रीतीच मुळाशीं असावी लागते. जितकी भक्ति वा प्रेम उत्कट तितकी त्या वस्तूच्या वा व्यक्तीच्या वियोगाची कविता जास्त उत्कट. एखादे वेळीं कवि प्रतिभेच्या दृष्टीने कमी दर्जाचा असला, तरी त्याच्या काव्याच्या मुळाशीं भक्ति असल्यास त्याची प्रतिभा फुलल्याखेरीज रहात नाही. इंग्रजी वाङ्मयांत मिल्टन, शेले, टेनिसन यांनी अनुक्रमे 'लिसिडास' 'अडोनिस्याज' व 'इन् मेमोरिअम' या तीन जगत् प्रसिद्ध विलापिका लिहिलेल्या आहेत. पहिली मिल्टनचा मित्र किंग एडवर्ड, दुसरी शेलेचा मित्र कवि कीट्स व तिसरी टेनिसनचा मित्र ऑर्थर हॅलम यावर आहे. वास्तविक पाहातां टेनिसन हा मिल्टन व शेलेच्या दृष्टीने कमी प्रतिभेचा कवि आहे पण टेनिसनचें काव्य त्यांच्या मित्रावरील भक्तीमुळे पहिल्या दोहोंच्या काव्यांपेक्षा हृदयाचा जास्त ठाव घेणारें झालें आहे. टेनिसनची इतर कवितांत दिसून येणारी, (चित्रमय सौंदर्य, ध्वनिसौंदर्य इत्यादींची) हौस लुप्तप्राय झालेली असून, त्याच्या प्रतिभेने तत्त्वचिंतकाची भूमिका घेऊन मृत्यू व जीवनासंबंधीच्या खोल अशा भावना व विचार साध्या प्रत्यक्ष पद्धतीने या काव्यांत प्रकट केल्या आहेत. पूर्वीच्या रसशास्त्रकारांनी भक्ति हा दहावा रस मानलेला आहे व तोहि जरासा अजिजीनेच ! हा प्रकार जरासा उलटा झाल्यासारखा वाटतो !

मनःकल्पित विरोधाभास

आनंदामधून सर्व काव्याचा जन्म आहे. आणि या आनंदाचें मूळ भक्तींतच आहे. प्रसंग दुःखमय असला किंवा करुणाजनक असला तरी ज्यावेळेला कवि काव्य लिहितो, त्यावेळेला त्याची मनःस्थिति आनंदमयच असते. काव्य वाचीत असतांना करुणरस उत्पन्न झाला तरी त्याच्या बुडाशीं वाचक एक प्रकारचा आनंदच लुटत असतो. कारण करुण काव्यांत सुद्धा कवीची तीच मनःस्थिति अंतर्भूत असते. हा मनःकल्पित विरोधाभास (Fantastical paradox) वाटेल पण तें सत्य आहे: मीलन व वियोग या दोहोंतहि आनंद आहे. किंबहुना मीलनापेक्षाहि वियोगांत एक प्रकारचा जास्त आनंद असतो. संपूर्ण मीलनानंतर मनाची तळमळ शांत होते व पूर्वीच्या अनिर्वचनीय आनंदास मनुष्य मुकतो. उदाहरणार्थ, देवनायांच्या 'चाल सख्या मनमोहना–युगसम जाते घडी । सख्या तूं जीवींचा जिवलग गडी—नूतन तनु तारुण्य वय वा जातसे वाया'—या ओळींतील मनोज्ञ सूचकतेमध्ये विरहाच्या दुःखांतीलहि कवीचा आनंदच व्यक्त होत आहे. विरहांत जेवढा आनंद आहे तेवढा मीलनांतहि नाही, हें जाणूनच की काय, संतकवींनी ब्रह्मानंद म्हणजें मीलन नको, तुझी भक्तीच पाहिजे असेंच म्हटलेलें आहे. भक्ति ही दुसरी तिसरी कांही नसून विरहाचीच

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक गोड अवस्था आहे. कारण विरह संपून परमेश्वराशी (येथे परमेश्वर हा शब्द सांप्रदायिक अर्थानें वापरला नाही.) पूर्ण तादात्म्य झाल्यानंतर (त्या एकरूपतेनंतर) भक्त व भक्तिविषय एकरूप झाल्यामुळें भक्तीचें कांही कार्यच उरत नाही व भक्ति तेथेंच संपते. भक्तीनें परमोत्कट आनंदांत मन अक्षय सळसळत राहतें—तीच जीवनाची ब्राह्मी स्थिति आहे !!

सौंदर्य झरा

काव्याला उत्कट जिव्हाळ्याची (High sincerity) ची जरूरी आहे असें सर्वत्र मानण्यांत येते. त्याचेच नांव भक्ति. उत्कृष्ट कवि व्हावयाचें असेल तर त्याने अभिजात काव्यकृतींचा सखोल अभ्यास करावयास पाहिजे असें आवर्जून वेळोवेळी सांगण्यांत येते, ग्रंथाच्या अभ्यासाचें महत्त्व अर्थातच कमी नाही. बुद्धिगम्य विचाराकरतां ग्रंथाचें साहाय्य बरेंच होतें यांत शंका नाही. पण प्रतिभागम्य विचाराकरतां ग्रंथांचा तेवढासा उपयोग होत नाही. उत्कृष्ट काव्यकृतीकरतां जर कवि ग्रंथावरच बहुशः अवलंबून राहील तर अभिजात काव्याची तो खराब नक्कल करून ठेवील ! कवीला एखाद्या वेळेस चांगला विचार सुचला तरी अमुक ग्रंथांत तो आलेला आहे, या भावनेने तो तेथेंच टाकून देईल किंवा अभिजात ग्रंथाचें प्रकटीकरणाचें व विचाराचें सर्वश्रेष्ठ स्वरूप पाहून तो विचार आपण कांहीं अंशीं का होईना तसाच व्यक्त करूं शकूं का, असें वाटून तो तेथेंच थांबण्याचाहि संभव आहे. किंवा ग्रंथांतील विचार जसेच्या तसेहि त्याच्या काव्यांत येणें संभवनीय आहे.

विचार तर राहोच, पण तेच ते वाक्यप्रचार. त्याच त्या उपमा उत्प्रेक्षा प्रतिमासृष्टि वगैरे वरचेवर येतात. कित्येकांनी कांही थोडेच ग्रंथ अगदी आत्मसात् केलेले असतात, तेथे या गोष्टी फारच घडतात ! त्यामुळे बहुतेक काव्यांत स्वतःच्या विचारांच्या सूक्ष्म छटा येऊं शकत नाहीत व काव्यें कायम ठशाचीं होतात. त्यांत नवीन अशा वैशिष्ट्ययुक्त भावना, विचार वा कल्पना फार थोड्या आढळतात.

कवीनें काव्याचें मूळ जी खरीखुरी भक्ति ती निर्माण होण्याकरतां ग्रंथाकडे धाव मारण्यापेक्षा निसर्गाकडेच वळलें पाहिजे. सृष्टींत रंग, रस, रूप, गंध, नाद यांची इतकी विविधता आहे की, सृष्टीच्या बुडाशीं असलेल्या विराट सौंदर्यझऱ्याच्याच तरंग—तुषारांचाच आविष्कार बाह्य सृष्टींत क्षणोक्षणीं होत असतो. इंद्रधनुष्य, उषा, संध्या व मोरांसारख्या पक्षांचे रंग व डौलदार गति तर राहोच, पण अगदी लहान अशा फूलपाखरांच्या किंवा कुक्कुटासारख्या प्राण्यांच्या अंगावरील रंगाचें मिश्रण व डौलदार गति त्याच्या मनांत अनिर्वचनीय आनंद उत्पन्न केल्याखेरीज रहाणार नाही. सृष्टीवर त्याची भक्ति जडेल आणि मग सृष्टि त्याला आपली अकथित व अश्रुत गूढें सांगितल्याशिवाय रहाणार नाही. हा कवींना मी उपदेश करीत आहे, असें त्यांनी कृपा करून मानूं नये. तो माझा अधिकार नाही—पण काव्याच्या बाबतींत जे विचार सुचले ते व्यक्त करीत आहे एवढेच ध्यानांत असूं द्यावे. त्या भक्तीच्या आनंदांतूनच शाश्वत काव्यकृति निर्माण होणें शक्य आहे. जो चित्रकार पूर्वीच्या, अभिजात चित्रकारांवरच केवळ अवलंबून राहुन त्यांचेंच अनुकरण न करतां सृष्टींतूनच आपल्या कलेकरतां प्रतिरूपें (Models) घेतो, त्याचीच चित्रें यशस्वी होतात.

त्याचप्रमाणें ब्रह्मांडाच्या सत्तेचें सार्वभौम स्वरूप पाहण्याचा स्वतः प्रयत्न करावयास पाहिजे. प्राचीन जुने ग्रंथ व त्यांवरील टीका वाचून आपण हरघडी तेंच तत्त्वज्ञान दुसऱ्यास सांगत असतो, तेंहि चांगलेंच आहे, पण तें तत्त्वज्ञान वाचून 'स्वयंज्योति प्रकटली,' 'मी विश्वाचा राजा', अशा कल्पना काव्यांत व्यक्त करण्यांत कांही लभ्यांश नाही. सृष्टीपासून प्रत्यक्ष अनुभव (Direct experience or fitst hand Knowledge) घेण्याची सवय ज्या कवींत निर्माण होईल तोच सृष्टिसौंदर्याच्या गूढाची खरी खुरीं चित्रें रेखाटूं शकेल. किंवा 'अहं ब्रम्हास्मि' 'स्वयंज्योति प्रकटली' अशासारखीं तत्त्व ज्यांनी अल्पांशाने तरी कां होईना अनुभविलीं, त्यांचीच काव्यें शाश्वत होणार. प्रत्येक कवि सृष्टिपासूनहि कांही अजाणतां घेतोच व

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कांही कांही भावना-अनुभव एकाद्या कणाने अनुभवितोहि; पण हें मोठ्या प्रमाणावर व्हावयास पाहिजे.

शब्दांतील सामर्थ्य

कोणताही मूलगामी अनुभव वा विचार एखाद्या तत्त्वचिंतकाकडून वा ग्रंथांतून घेऊन आपण आपल्या काव्यांत उपयोगांत आणला, यापेक्षा तसा एखादा अनुभव वा विचार आपण आपल्या स्वतःच्या चिंतनांतून घेऊं शकलों व तो आपल्या काव्यांत नवीन पद्धतीने चित्रित केला याचा आंनद कांही और असतो. याचें कारण म्हणजे तसाच अनुभव वा विचार पूर्वीच्या उत्कृष्ट ग्रंथांत आलेला आहे किंवा एकाद्या तत्त्वचिंतकाने केलेला आहे, हें कळून आल्यानंतर, आपणहि श्रेष्ठ ग्रंथाला किंवा श्रेष्ठ चिंतकाला साजेसा विचार करूं शकतों. हें आपल्या मनांत येऊन आपल्याला एक प्रकारची धन्यता वाटते.

अनुभव वा विचार कित्येक वेळेला तेच असतात. ते दुसऱ्यांच्या तोंडून ऐकले किंवा ग्रंथांतून वाचले तर ते तितकेसें स्पष्ट होत नाहीत व त्यामवून उत्कृष्ट प्रतीचीं काव्यें निर्माण होत नाहीत. ग्रंथ परिशीलनामुळेहि आपले कांही विचार स्पष्ट होतात हें खरें आहे; व त्यावरून कांही नवीन विचार व कल्पनाहि सुचतात; पण सृष्टींतून प्रत्यक्ष घेतलेल्या अनुभव-विचारांइतके ते स्पष्ट असत नाहीत किंवा नवीनहि असत नाहीत. अनेक तऱ्हेचीं काव्यसमीक्षांची किंवा तत्त्वज्ञानाचीं पुस्तकें आपल्या वाचनांत येतात. कोणाचीं मतें बरोबर आहेत वा कोणाचीं चुकीचीं आहेत, किंवा अस्पष्ट वा कठीण असणारे सिद्धांत स्पष्ट केलेलीं पुस्तकेंहि आपण वाचतो. कोणतें तत्त्व चुकीचें आहेत किंवा बरोबर आहे असे आपण त्या ग्रंथांच्या आधारें सांगतों. व तेवढेच बहुधा आपण सांगूं शकतों. आपल्याला त्या तत्त्वाविषयीं निश्चित आपलें असें कांहीच सांगता येत नाही. ही स्थिति सर्वसाधारणतः दृष्टीस पडते. ज्यांनी तत्त्वज्ञानाचीं मूळ तत्त्वें अनुभविलीं तेच बहुधा त्या तत्त्वांबद्दल वा सिद्धांताबद्दल निश्चित सांगूं शकले किंवा सांगूं शकतात. ज्यांचे ग्रंथ आपण वाचतो, त्यांचेच अनुभव व विचार आपणास खरे वाटतात किंवा जीं मर्यादित पुस्तकें वा एकच ग्रंथ आपण वाचतों तशीच आपलीं मतें बनत जातात. कित्येक ग्रंथकार स्वतःचे अनुभव व विचार खरे नसतांना सुद्धा आपल्या लेखनकौशल्याने एवढे आकर्षक रंगवितात की आपण ते खरे आहेत असें धरून चालतो ! त्यांच्या व्याख्या व मोठाले शब्द आपणास माहित असतात पण त्या शब्दसमुच्चयाचे नक्की अर्थ कोणते हें आपणास कळत नाही व त्यांतील शब्दांतील व अनुभवांतील सामर्थ्य व सौंदर्य आपणास तेवढेसें प्रतीत होत नाही. प्रत्येक शब्द हा अर्थाने ओथंबलेला आहे. त्याचा वरवरचा अर्थ जेवढा साधारणतः सर्वांस प्रतीत होतो. तेवढाच त्यांत नसतो. त्यांत अंतर्भूत असलेला अर्थ, आपण जेव्हा अगोदर अनुभवूं तेव्हाच त्या शब्दाचा खराखुरा आशय समजेल ! ग्रंथासंबंधी जें मी वर लिहिलें ते विशेषतः कवी किंवा कलाकारांच्या बाबतींत आहे.

कवि व रसिक यांना त्याच तऱ्हेचे अनुभव आल्यास काव्य जास्त चांगल्या तऱ्हेने समजूं शकेल. केवळ कल्पनेच्या साह्याने काव्याचा तेवढासा आशय समजणें अशक्य आहे. त्यामुळे कवीचे कित्येक अनुभव येवढे अशक्य कोटींतील वाटतात की, ' Poets give us half-truths ' असें म्हणण्यापर्यंत टीकाकारांची पाळी जाते, व ' ती एक कविकल्पना आहे ' असे कधी कधी म्हणण्यांत येते ! पण तत्त्वज्ञ कवि कधी कधी पूर्ण सत्याच्या जवळपासच विहार करीत असतो. पाश्चात्त्य व पौर्वात्त्य तत्त्वज्ञान्यांनी विश्वशास्त्र-ईश्वराचें अस्तित्व वगैरे (cosmology), द्वैताद्वैत (Ontology) परमाणूवाद (Atomic theory) शक्तिवाद (Energism) अज्ञेयवाद (Agnosticism) इंद्रियानुभववाद (Empirioism) इत्यादि दृष्टिकोणांतून सृष्टि, मानव व देव यांतील अन्योन्य संबंधाच्या गोफांतील पीळ विणण्याचा किंवा उकलण्याचा प्रयत्न केलेला आहे, तरी त्यांतील तत्त्वें किती जणांस स्पष्ट झालीं असतील हा विचारण्यासारखा प्रश्न आहे ! याचें कारण हेंच की तीं तत्त्वें स्वतः अनुभविणारे अगदीच थोडे असतात. या मुद्याबद्दल

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

थोडेसें विवेचन, सोदाहरण पुढील लेखाकांत लिहिलें आहे.

चिंतनं व स्फुरण

काव्याच्या बाबतींत चिंतन व स्फुरण यांस फार महत्त्व आहे. विश्वांतील इतरत्र कोणत्याहि गोष्टी-पासून स्फूर्ति घेण्यापेक्षा श्रेष्ठ तत्त्वज्ञ–द्रष्टा–कवि आपल्या भक्तिवस्तूपासूनच स्फूर्ति घेत असतो. भक्तीमुळे त्याला त्या विषयांत सौंदर्य प्रतीत होत असतें (किंवा कित्येक वेळी सौंदर्यातूनहि भक्ति निर्माण होते.) भक्तिमुळेच नवीन नवीन अनुभव स्फुरतात व भक्तिमुळेच प्रतिभा फुलारून येते. भक्तिमुळेच चिंतनाचें कार्य अव्याहत चालूं रहातें. भक्तिमुळेच आनंद ओसंडून येतो व त्या आनंदामधून जाणीव, भावना, बुद्धि, प्रतिभा, स्फूर्ति, कल्पना, कल्पकता, कल्पनातरंग, मनःकल्पित आकार इत्यादि अनुभव घेण्या–देण्याच्या कवीच्या सर्व मानसिक शक्ति एक-वटून कार्यान्वित होऊन त्यांतूनच अमर काव्यांचा संभव होतो.

विदर्भ साहित्य संघाचीं प्रकाशनें

१. निबंध परिमल	(निवडक मौलिक निबंधांचा संग्रह)	रु. २–४–०
२. सुमन संचय	(कविता संग्रह)	रु. १–४–०
३. मराठी गद्य	(मराठी साहित्यांतील निवडक वेचे)	रु. १–८–०
४. अंमलदार	(नाटक) लेखक–श्री पु. ल. देशपांडे	रु. २–०–०
५. भारती	(नाटक) लेखक–श्री नाना जोग	रु. १–८–०
६. हिंदी मराठी भाषा प्रवेशिका	लेखिका–श्रीमती मालतीबाई श्रीखंडे	रु. ०–१२–०

कै. राम गणेश गडकऱ्यांच्या साहित्यावरील अभ्यासपूर्ण प्रबंध

१. वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन	—डॉ. मा. गो. देशमुख	रु. ०–६–०
२. नाटककार गडकरी	—श्री द. रा. गोमकाळे	रु. ०–६–०
३. गोविंदाग्रज यांचा कवि या नात्याने विचार	–कविभूषण अण्णासाहेब खापर्डे	रु. ०–८–०
४. गडकऱ्यांच्या नाटकांतील स्वगत	—प्रा. श्री. मा. कुळकर्णी	रु. ०–८–०

सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, केन्द्रीय कार्यालय, उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सं घ वा र्ता

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, वि. सा. संघ
यांजकडून

केंद्रवृत्त नागपूर,

कार्यकारी मंडळाची सभा

विदर्भ साहित्य संघाच्या जुन्या कार्यकारी मंडळाची सभा दि. ३१–३–५६ रोजीं सायंकाळीं ६–३० वाजतां उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांचे अध्यक्षतेखालीं केंद्रीय कार्यालयांत भरली.

प्रथम कै. डॉ. भाऊजी दप्तरी यांच्या निधनानिमित्त दुखवटयाचा पुढील ठराव एकमताने मंजूर झाला.

" विद्वद्रत्न डॉ. केशव लक्ष्मण उर्फ भाऊजी दप्तरी यांच्या शोचनीय निधनाबद्दल विदर्भ साहित्य संघास अत्यंत दुःख होत आहे. डॉ. दप्तरी हे या प्रांतांतीलच नव्हे, तर अखिल भारतांतील नामवंत विद्वानांपैकी एक असून त्यांच्या निधनाने समचिकित्सा, ग्रहगणित, धर्मशास्त्र व वेदान्तशास्त्र हीं कांही काल तरी पोरकीं झाल्यासारखीं झालीं आहेत. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गति देवो.''

चिटणीस श्री. तु. ना काटकर यांची कै. भाऊजी दप्तरींचें एक तैलचित्र संघांत लावण्याची सूचना सर्वानुमतें मंजूर झाली.

सरचिटणिसांनी श्रीमान् बाबासाहेब खापर्डे, अध्यक्ष, यांचें आभाराचें पत्र आणि ११–३–५६ च्या सभेचा अहवाल वाचून दाखविला व तो सर्वानुमतें मंजूर झाला.

त्यानंतर सरचिटणिसांनी दि. १–४–५५ ते ३१–३–५६ च्या अखेरच्या जमाखर्चाचा तक्ता सभेला सादर केला. या जमाखर्चांत ऑडिट फी वेगळी दाखविण्यांत यावी व इतर किरकोळ दुरुस्त्या कराव्यांत असें ठरलें. तसेंच कोणत्याहि समितीने आपल्या उत्पन्नांतून परस्पर खर्च न करतां वि. सा. संघाचा होणारा प्रत्येक खर्च केंद्रीय कार्यालयातर्फे व्हावा असें सर्वानुमतें ठरलें. १९५५–५६ सालांतील परीक्षा समितीने दिलेल्या उत्पन्नाबाबत, परस्पर पुरस्कार कापून घेण्यासंबंधी तयार केलेली खरी मुद्रा व्यवहाराच्या दृष्टीने इष्ट नाही असें सर्वानुमतें ठरून या बाबतचा श्री. दि. ब. पंडित यांनी ठराव मांडला व तो मंजूर झाला.

ठरावः—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"१९५५-५६ च्या अंदाजपत्रकांत परीक्षा समितीच्या खर्चासाठी मंजूर करण्यांत आलेल्या रकमेंत केंद्राधिकाऱ्यांना मानद्रव्य देण्याची व्यवस्था नसल्यामुळे आणि असें मानद्रव्य देणें परीक्षा प्रचाराला उपकारक होईल असें परीक्षा समितीस वाटल्यामुळे उगमस्थानींच मानद्रव्य कापून उर्वरित परीक्षा शुल्क संघाकडे दाखल करण्यास परीक्षा समितीने सुचविलें त्याला ही सभा अनुमति देत आहे, आणि मानद्रव्याच्या पुरस्काराचें तत्त्व मान्य करून तशी तरतूद अंदाजपत्रकांत करीत जावी असें ठरवीत आहे."

ह्या सर्व दुरुस्त्यांसह १९५५-५६ च्या जमाखर्चाचा तक्ता सर्वानुमतें मंजूर झाला.

सरचिटणिसांनी १९५६-५७ चें अंदाजपत्रकांत सादर केलें. कांही किरकोळ दुरुस्त्यांसह हें अंदाजपत्रक पुढील कार्यकारी मंडळाच्या सभेला सादर करण्यांत यावें असें ठरलें.

ह्या सभेच्या शेवटीं उपाध्यक्ष श्री. ना. रा. शेंडे यांनी नवीन संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांना अधिकार-प्रदान केलें.

* *

कार्यकारी मंडळाची सभा

विदर्भ साहित्य संघाच्या नवीन कार्यकारी मंडळाची सभा दि. १-४-५६ रोजीं सकाळीं ९ वाजतां संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय कार्यालयांत भरली.

सरचिटणिसांनी दि. १३-३-५६ च्या कार्यकारी मंडळाच्या सभांचे अहवाल वाचून दाखविले व ते एकमताने मंजूर झाले.

त्यानंतर समित्या-उपसमित्यांची पुढीलप्रमाणे निवड करण्यांत आली. घटनेंत उल्लेखिलेले कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी तीन वर्षांसाठीच असावेत आणि समित्या-उपसमित्या एक वर्षाकरितां नेमण्यांत याव्यात असें सर्वानुमतें ठरलें. आणि पुढील ठराव मंजूर झाला.

"प्रत्येक समितीवर संघाध्यक्ष आणि सरचिटणीस हे दोघे पदसिद्ध सभासद राहतील. संबंधित समितीच्या सूचनेनुसार जास्तींत जास्त दोन अधिक सभासद स्वीकृत करून घेण्याचा अधिकार अध्यक्षांना राहील."

संघाध्यक्ष हेच प्रत्येक समितीचे, अन्य उल्लेख केला नसेल तर, अध्यक्ष राहतील असेंहि ठरलें.

समित्या-उपसमित्यांची निवड:—

निविदा व प्रकाशन समिति—आमंत्रक—श्री. श्री. गो. काशीकर, **सभासद**: श्री. बाळासाहेब ढवळे, कु. ताराबाई प्रधान, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. माणिक के. वैतुले.

पुस्तकालय समिति—आमंत्रक: श्री पां. बा. गडकरी, **सभासद**:-श्री. ग. नी. भवाळकर, डॉ. वि. भि. कोलते, श्री. दि. ब. पंडित.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी' संपादकमंडळ--संपादक : प्रा. पां. कृ. सावळापूरकर. **सभासद** : प्रा. कृ. व्यं. पेशकार (अमरावती), प्रा. मा. ल. व्यवहारे (अमरावती), प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे, श्री. रा. ना. घाटोळे, श्री. प्र. दे. कोलते. प्रा. का. श्री. परांजपे, श्री. तु. ना. काटकर, (चांदा)

साहित्य संस्था सहकार समिति--आमंत्रक : श्री. मा. गो. जामदार, **सभासद** : श्री. ल. वि. पांढरीपांडे, श्री. तु. वि. गेडाम.

मंदिर समिति—अध्यक्ष : न्या. मू. के. तु. उर्फ अण्णासाहेब मंगळमूर्ति, **कार्यवाह** : श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. नानासाहेब जोग व श्री. बाबुराव चिमोटे; **सभासद** : सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्री. गो. स. देहाडराय, श्री. य. वा. शास्त्री, श्री. ए. श्री. पटवर्धन, श्री. ना. रा. शेंडे, कु. ताराबाई प्रधान, श्री. य. गो. माल्होदे.

भाषाविषयक संशोधन व परिभाषा समिति--आमंत्रक : प्रा. सुरेश म. डोळके, **सभासद** : म. म. वा. वि. मिराशी, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, डॉ. वि. भि. कोलते. प्रा. ग. त्र्यं. देशपांडे, प्रा. भ. श्री. पंडित.

परीक्षा समिति—संचालक: प्रा. माणिक के. वैतुले. **सभासद** प्रा. पां. कृ. सावळापूरकर, प्रा. या. मु. पाठक, सौ. उषाताई कोलते, श्री. रा. पु. सगदेव, श्री. दि. व. पंडित, श्री. द. शं. फडके, श्रीमती शकुंतलाबाई दिवाणजी, श्री. तु. ना. काटकर, श्री. गो. मो. रानडे, प्रा. दा. ल. अडोणी, श्री. रा. वि. करपे, श्री. व. बा. शब्दे; श्री. वि. गो वेलणकर, श्री. तु. ब. बोडखे, सौ. कमलिनी पागे.

गडकरी स्मारक समिति—अध्यक्ष : श्री. न्या. मू. बा. रा. पुराणिक; **कार्याध्यक्ष** : कु. ताराबाई प्रधान; **कार्यवाह** : श्री. पां बा. गडकरी; **सभासद** : श्री. द. रा. गोमकाळे; श्री. रा. पु. सगदेव; श्री. र. वि. कुळकर्णी; श्री. श्री. वि. गंधे; सौ. इंदुमति गंधे; सौ. उषाताई कोलते; श्रीमती पद्मावतीबाई चिटणीस; सौ. मालतीबाई प्रधान; श्री. बाबुराव चिमोटे; श्री. ना. रा. शेंडे,

सीमा समिति—सभासद : श्री. ए. श्री. पटवर्धन, डॉ. एकबोटे, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. ना. ग. डबीर; श्री. एम्. आर्. वाईकर; श्री. मा. त्र्यं. धर्माधिकारी; श्री. खुशालराव पराते; श्री. राजाभाऊ महाजन.

सांस्कृतिक कार्यक्रम समिति—आमंत्रक : श्री. रा. पु. सगदेव; **सहआमंत्रक** : श्री. चं. प. भिशीकर; **सभासद** : सौ. कुसुमावतीबाई देशपांडे, श्री. य. गो. माल्होदे, श्री. श्री. ग. पांढरीपांडे, श्री, गो. स. देहाडराय, श्री. ना. हि. सोनडुले, सौ. प्रा. कुसुमताई मराठे, श्री. र. वि. कुळकर्णी, श्री. दि. ब. पंडित, श्री. द. रा. गोमकाळे, श्री. पां. बा. गडकरी.

नाट्य समिति—आमंत्रक : श्री. द. रा. गोमकाळे; **सभासद** : डॉ. सौ. श्यामलबाई चितळे, श्री. मनोहर रामचंद्र खोलकुटे, श्री. पां. बा. गडकरी, श्री. रा. पु. सगदेव, श्री. केशवराव केळकर, श्री. चं. प. भिशीकर, श्री. बाबुराव चिमोटे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अध्यक्षांनी सभेला १९५६-५७ सालासाठीं अंदाजपत्रक सादर केलें.

अंदाजपत्रकावर साधकबाधक चर्चा होऊन किरकोळ दुरुस्त्यांसह सुधारलेलें अंदाजपत्रक सर्वसाधारण वार्षिक सभेसमोर ठेवण्यांत यावें असें ठरलें.

सरचिटणिसांनी कार्याच्या धोरणासंबंधीचे विचार सभेला सादर केले.

त्यानंतर सरचिटणिसांनी सभासदत्वासाठी आवेदनपत्राचा मसुदा मांडला व तो मंजूर झाला. पावतीवरील सध्याचा नमूनाच कायम ठेवून पावतीमागील उद्देशाचा नमूना काढून टाकण्यांत यावा असें या सभेंत ठरलें.

यावर्षी कै. टिळक-आगरकर शतसांवत्सरिक उत्सव करावा असें सर्वानुमतें ठरलें.

* *

मंदिर समिति

विदर्भ साहित्य संघाच्या मंदिरनिधि समिति आणि मंदिररचना समिति या दोन समित्यांची संयुक्त सभा दि. १०-३-५६ रोजीं सायंकाळीं ६-३० वाजतां विदर्भ साहित्य मंदिरांत न्या. मू. के. तु. मंगळमूर्ति यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती.

सभेंत पुढील कामकाज सर्वानुमतें झालें—

१ श्री. नानासाहेब जोग यांनी झालेल्या कामाचें प्रतिवृत्त वाचून दाखविलें. त्याला संमति देण्यांत आली.

२ मंदिर निधि आणि मंदिर रचना समिति या दोहोंची मिळून एकच समिति, मंदिर समिति या नांवानें करण्यांत यावी.

३ श्री. नानासाहेब जोग यांनी "हॅम्लेट" नाटकाची जी नवीन रंगावृत्ति तयार केली आहे ती मंदिर निधीच्या साहाय्यार्थ रंगभूमीवर आणण्याचा प्रयत्न करण्यांत यावा.

* *

मुख्यमंत्र्यांकडे शिष्टमंडळ

रविवार ता. ४-३-५६ रोजीं सायंकाळीं ६ वाजतां मंदिर समितीतर्फे मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ल यांच्याकडे रंगमंदिरासाठी जागा आणि अनुदान यांच्यासंबंधी विनंती करण्यासाठी न्या. मू. मंगळमूर्ति यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ नेण्यांत आलें.

शिष्टमंडळानें रंगमंदिरासाठी--१, जास्त जागा २, अनुदान ३, इमारतीच्या बांधकामासाठी लोखंड आणि सिमेंट व इतर जरूर तें साहाय्य करण्याची विनंती मध्यप्रदेश सरकारला केली होती. पं. शुक्ला यांनी शिष्टमंडळाच्या मागण्याचा विचार सहानुभूतीने करण्यांत येईल असें आश्वासन दिलें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दि. ४-४-५६ रोजीं संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी सहकाऱ्यांसह सकाळीं ९ वाजतां स्थानिक स्वराज्यमंत्री श्री. पु. का. देशमुख यांची भेट घेऊन त्यांना जागेसंबंधींच्या मागणीची आणि अडचणीची माहिती दिली. त्यांनी सर्व हकीकत ऐकून घेऊन मोकळ्या मनाने सल्ला दिला व शक्य तें साहाय्य करण्याचें आश्वासन दिलें.

ता. १० एप्रिल १९५६ रोजीं सायंकाळीं ७ वाजतां पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांच्याबरोबर संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी सहकाऱ्यांसहित मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ल यांची भेट घेऊन रंगमंदिराच्या बांधकामासाठी रु. ५०,००० ची ॲडव्हान्स ग्रॅन्ट देण्यासंबंधी त्यांना विनंती केली. पं. शुक्ल यांनी त्या विनंतीचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचें आश्वासन दिलें.

ता. ११ एप्रिल १९५६ रोजीं सायंकाळीं ५-३० वाजतां नझूल सर्व्हेअरनी, विदर्भ साहित्य संघाने रंगमंदिराच्या बांधकामासाठी मागितलेल्या पश्चिमेकडील नवीन जागेचा ताबा मंदिरसमितीच्या कार्यवाहांना दिला. ही जागा ०.२५ एकर (२५ डेसिमल) म्हणजे १०८९० चौ. फूट आहे.

* *

वि. सा. संघ, रंगमंदिराच्या बांधकामाचा मुहूर्त

विदर्भ साहित्य संघाच्या रंगमंदिराच्या बांधकामाचा मुहूर्त-समारंभ वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर गुरुवार दि. १२-४-५६ रोजीं सकाळीं ७॥ वाजतां मध्यप्रदेशाचे स्थानिक स्वराज्य मंत्री श्री. पुरुषोत्तम काशीराव देशमुख यांच्या हस्तें थाटाने पार पडला.

या शुभप्रसंगीं त्यांनी साहित्यिक आणि पत्रकार यांच्यावरील नवी जबाबदारी कोणती आहे याबाबत उद्बोधक विचार उपस्थितांपुढे मांडले.

श्री. बाळासाहेब ढवळे, अध्यक्ष, वि. सा संघ, यांनी रंगमंदिरासंबंधीची कल्पना सर्वांसमोर मांडली. श्री. नानासाहेब जोग यांनी रंगमंदिराच्या योजनेची माहिती सांगितली. सरतेशेवटीं श्री. श्री. गो. काशीकर, सरचिटणीस यांनी पाहुण्यांचे आभार मानले. यानंतर प्रसाद व पानसुपारी वाटल्यानंतर हा समारंभ संपला.

* *

पं. द्वारकाप्रसाद मिश्र, उपकुलगुरु, सागर विद्यापीठ यांचा वि. सा. संघातर्फे सन्मान

दि. १३-४-५६ शुक्रवार रोजीं सायंकाळीं ६ वाजतां सागर विद्यापीठाचे नवीन उपकुलगुरु पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांचा सन्मान वि. सा. संघातर्फे करण्यांत आला.

सुरुवातीला संघाध्यक्ष श्री. बाळासाहेब ढवळे यांनी प्रास्ताविक भाषण करून पं. द्वारकाप्रसाद मिश्र यांना पुष्पहार घातला. तदनंतर म. म. वा. वि. मिराशी, श्री. मा. ज. कानेटकर, डॉ.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वि. भि. कोलते, प्रा. पां. कृ. सावळापूरकर, आणि श्री. ग. त्र्यं माडखोलकर यांचीं गुणगौरवपर भाषणें झालीं.

नंतर प्रा. श्री. गो. काशीकर यांनी सर्वांचे आभार मानले. शेवटीं उपस्थितांना अल्पोपाहार देण्यांत आल्यानंतर हा समारंभ आटोपला.

* *

खामगांव शाखा

दि. ३१-३-५६ रोजीं डॉ. पट्टाभि सीतारामय्या, मध्यप्रदेशाचे राज्यपाल यांचे हस्तें, खामगांव वि. सा. संघशाखेच्या, कै. कोल्हटकर स्मारकाच्या जागेचा भूमिपूजनाचा समारंभ पार पडला.

* *

सभासदांना व प्रचारकांना सूचना

१. विदर्भ साहित्य संघाचे नवे वर्ष रविवार दि. १ एप्रिल १९५६ पासून सुरू झालें आहे

२. दि. २९ जानेवारी १९५६ रोजीं विशेष साधारण सभेंत मंजूर झालेल्या घटना दुरुस्ती-प्रमाणे नवीन सभासदांना आवेदनपत्र भरून त्यांच्यासह वर्गणी पाठवावी लागेल.

३ जुन्या सभासदांची वर्गणी शनिवार ३१ मार्च १९५६ रोजी संपली. त्यांनी आपली नवीन वर्षाची सभासदत्वाची वर्गणी त्वरित केंद्रीय कार्यालयाकडे पाठविण्याची कृपा करावी. वर्गणी आल्याखेरीज युगवाणीचे पुढील अंक त्यांच्याकडे पाठविले जाणार नाहीत.

४. सर्व जुनी पावती पुस्तकें आता रद्द झाली असल्याने त्यांवर वर्गणी स्वीकारली किंवा दिली जाऊं नये. नवीन पावती पुस्तकें छापून झालीं आहेत. तरी ज्या प्रचारकांकडे जुनीं पावती पुस्तकें असतील ती त्यांनी हिशेबासह त्वरित कार्यालयाकडे परत पाठविण्याची कृपा करावी व नवीन घेऊन जावींत.

दि. १-५-५६
केंद्रीय कार्यालय
उत्तर अंबाझरी रस्ता; नागपूर १

श्री. गो. काशीकर
सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

२० फेब्रुवारी १९५६ रोजीं ज्या निवडणुकीचें मतदान समाप्त झालें त्या निवडणुकीबाबत आलेल्या तक्रार अर्जाच्या निकालाचा सारांश—

लवाद--श्री. खं. के. रांगोळे,

अर्जदार--श्री. शं. ना. सहस्रबुद्धे,

गैरअर्जदार--श्री. बाळ दि. ढवळे; श्री. या. मु पाठक व कार्यकारी मंडळाच्या सभासद-त्वाकरिता उभे राहिलेले अर्जदाराव्यतिरिक्त बाकीचे सर्व सदस्य.

अर्जदारांनी आपल्या अर्जाद्वारें वरील निवडणुकीविरुद्ध हरकती उपस्थित करून त्या निवडणुकी नाजायज ठरवाव्या व कांही झालें तरी "३ वर्षांची नाही", असा निकाल व्हावा, अशी प्रार्थना केली. ह्याच अर्जांत त्यांनी विद्यमान् लवादाच्या लवादाचें काम करण्याच्या योग्यतेबद्दल हरकत घेऊन अशीहि प्रार्थना केली की, घटना नियम १० (आ) प्रमाणे साधारण सभा घेऊन तीमध्ये घटना नियम १२ (अ) प्रमाणे योग्य लवाद निवडून त्याचेपुढे अर्जदाराच्या तक्रार-अर्जाची सुनावणी व्हावी.

ह्या अर्जाची सुनावणी दि. ७ व ८ एप्रिल १९५६ ला झाली. गरअर्जदारांपैकी श्री. श्री. गो. काशीकर; श्री. य गो. मालोदे व श्री द. शं. फडके यांचेकडून लेखी निवेदनें आलीं व सुनावणीच्या वेळीं श्री. काशीकर, श्री. मालोदे व निर्वाचनाधिकारी श्री. मुंजे हे दोन्हीहि दिवशीं व श्री. फडके केवळ दि. ७ ला हजर होते. निकाल दि. १७-४-५६ ला देण्यांत आला असून निकालपत्रकाची एकूण ११ टंकलिखित पानें झाली आहेत.

सुनावणीच्या वेळीं प्रथम खालील हरकत विचारांत घेण्यांत आली,

"दि. २९-१-१९५६ वरील अनधिकृत सभेंत वरील तीन वर्षांच्या निवडणुकीचा व तिची अंमलबजावणी यंदापासूनच करण्याचा ठराव श्री. रांगोळे लवाद महाशयांनीच स्वतः पुरस्कारपूर्वक मांडला असल्यामुळे घटना नियम १२ (अं) च्या तत्त्वाप्रमाणे त्यांची लवाद या नात्याने नेमणूक व भूमिका निसर्गदत्त न्यायाच्याच विरुद्ध आहे."

घटना नियम १२ (अं) पुढीलप्रमाणे आहे.

"१२ (अं) निवडणुकीबाबतच्या तक्रारीचा विचार करून निकाल देण्यासाठी साधारण सभेंत एक लवाद निवडण्यांत यावा. असा लवाद हा त्या निवडणुकींत उभा राहणारा उमेदवार किंवा त्यावेळेच्या चालू कार्यकारिणीचा सभासद नसावा."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वरील हरकतीसंबंधी लवादांनी पुढीलप्रमाणे निर्णय दिला.

"निवडणुकीबाबत सर्वहि तक्रारींचा निर्णय करण्याचें काम घटनेप्रमाणे केवळ लवादच करूं शकतो. म्हणून ही हरकतसुद्धा लवादाशिवाय विचारांत घेण्याला संघटनप्रमाणे दुसरी अधिकृत व्यक्ति नाही. अर्जदारांचें म्हणणें वर दिलेंच आहे. त्यांचा जो युक्तिवाद आहे तो ज्या समजुतीवर आधारित आहे ती मुळांतच चूक आहे असें मला वाटतें. नियम (अ) मध्ये "संघाचे अध्यक्ष व कार्यकारी मंडळ यांच्या निवडणुकी दर तीन वर्षांनी दिनांक १ मार्च रोजीं करण्यांत येतील." या वाक्यांत सकृद्दर्शनी जरी निवडणुकीशीं "तीन वर्षांचा" संबंध दिसतो तरी खरोखरी त्या तीन वर्षांच्या अवधीचा वास्तविक परिणाम निवडून आलेल्या सभासदांची पदावधि निश्चित करण्याचा आहे. ज्या वस्तूचा जो वास्तविक परिणाम असेल असेल तेंच त्याचें खरें स्वरूप मानण्याचा नियम न्यायसंमत आहे. यामुळे त्या तीन वर्षांच्या पदावधिसंबंधी कांहीहि निर्णय देणे हें लवादाच्या अधिकारमर्यादेच्या पलिकडे आहे हें अर्जदारांच्या ध्यानांत आलेलें नाही. हीच गोष्ट एक काल्पनिक परिस्थिति उदाहरणार्थ घेऊन अधिक स्पष्ट होईल, असें मला वाटते. समजा की २० फेब्रुवारीला मतदान होऊन २२ फेब्रुवारीला निकाल लागला असता व १० मार्चला विशेष साधारण सभेंत नियम १२ (अ) बदलविला गेला असता तर लवादाकडे तक्रार अर्ज होऊ शकला असता काय या प्रश्नाचें उत्तर नकारार्थीच द्यावें लागणार आहे. मग जी गोष्ट उशिरा झाली असती तर निवडणुकीशीं संबंधित नाही तीच आधी झाली म्हणून निवडणुकीशीं संबंधित कशी राहील? या मुद्यासंबंधाने विस्तृत चर्चा करण्याचें कारण वस्तुत: नाही; कारण आपल्या देशाच्या राजकीय क्षेत्रांत अशाप्रकारे सभासदांची पदावधि विधानसभेच्या सदस्यांच्या बाबतींत तसेंच स्थानिक स्वराज्य संस्थाच्या सदस्यांच्या बाबतींत अनेकवार वाढविण्यांत आली आहे. तेव्हा तीन वर्षांच्या अवधीचा जो मुख्य मुद्दा आहे तो निवडणुकीशीं संबंधित नसल्या कारणामुळे त्याबाबत कांही कारवाई लवादाने केली म्हणून लवादाला दोष लागू शकत नाही. त्याचप्रमाणे नियम १२ (अ) चा भंग झाल्याचा दोषहि लवादाला लागू शकत नाही. नियम १२ (अ) मध्ये जे स्पष्ट प्रतिबंध आहेत ते विद्यमान लवादास लागू नाही हें नियमाच्या भाषेंत स्पष्टच झालें आहे. आता लवादाने सर्वसाधारण सभेंत भाग घेतला हें जर लवादाला दोष लागू करण्याला पुरेसें असेल तर ज्या प्रत्येक व्यक्तीने निवडणुकींत मतें दिलीं त्या सर्वांनाहि हा दोष लागेल. याने एक अनवस्था प्रसंग निर्माण होईल म्हणून अशा प्रकारचा युक्तिवाद स्वीकारतां येत नाही. प्रत्येक सामाजिक संस्थेचा सभासद होणाऱ्या व्यक्तीवर त्या सामाजिक संस्थेच्या होणाऱ्या कामकाजांत आपल्या शक्ति-प्रमाणे काम करण्याची जबाबदारी आहे, नव्हे Civic Sense च्या दृष्टीने हें त्याचें कर्तव्य आहे आणि केवळ तें कर्तव्य कर्तव्यबुद्धीने केलें म्हणून ज्या गोष्टींशी त्याने केलेल्या कामाचा प्रत्यक्ष संबंध नाही अशा गोष्टीबाबत त्याला दोष (disqualification) निर्माण होणे शक्य नाही. विशेषत: प्रस्तुत बाबतींत तर विद्यमान लवादाने दि. २९-१-१९५६ च्या सभेंत जें कांही केलें, तें सर्व घटना समितीचा सदस्य या नात्याने व घटना समितीच्या ठरावाने दिल्या गेलेल्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आदेशानुरूप केलें म्हणून त्यांत व्यक्तीचाहि कांही प्रश्न उद्भवत नाही. या सर्व कारणांस्तव विद्यमान लवाद ही चौकशी करण्यास अधिकारी आहे असें मी जाहीर केलें. हें ठरल्यानंतर बाकीच्या हरकतींबाबत अर्जदाराचें म्हणणें ऐकण्यास सुरवात झाली व अर्जदारांनी पुढे कार्य चालविण्यास संमति दिली."

यानंतर अर्जाच्या परिच्छेद १ मधील हरकत विचारांत घेण्यांत आली. ही हरकत येणेप्रमाणे:--

"मतदाराकडे मतपत्रिका पाठविलेल्या पाकिटांवर व मतपत्रिकेवर एकाच क्रमांकाची विशिष्ट सांकेतिक खूण असल्यामुळे बॅलेटपेपरच्या (मतपत्रिकेच्या) गुप्त मतदान पत्रिकेची मूळ शुद्ध भूमिकाच न्यायत: दूषित अर्थात् अन्यायप्रद झाली आहे."

लवादांनी वरील हरकतीसंबंधी चौकशी केली व पुढील निर्णय दिला.

"मतपत्रिकांवर क्रमांक घालणें फसवाफसवी टाळण्याकरितां अवश्य होतें. तसेंच मतपत्रिकांवर व मतपत्रिका मतदारांकडे पाठविण्यास वापरलेल्या पाकिटांवर जे क्रमांक घातले गेले होते, त्यांची यादी कार्यालयांत किंवा निर्वाचनाधिकाऱ्यांजवळ नव्हती. मतपत्रिका मतदारांकडे ज्या पाकिटांतून पाठविल्या गेल्या होत्या त्या सर्वहि पाकिटांवर एकच जावक नंबर होता व मतपत्रिका मोजणीच्या वेळीं मतदारांकडून आलेलीं वरचीं पाकिटें (ज्यावर मतदारांच्या सह्या होत्या तीं) उघडून प्रथम तीं पाकिटें अलग सील करून ठेवण्यांत आल्यानंतरच मतपत्रिका ज्यांत होत्या तीं पाकिटें उघडण्यांत आलीं. या सर्व गोष्टींवरून माझें असें स्पष्ट मत आहे की सर्वसाधारणपणे कोणी कोणाला मतदान केलें हें ज्या पद्धतीनें हें सर्व काम केलें गेलें त्यामुळे उघडकीस येणें शक्य नव्हतें. म्हणून पहिल्या परिच्छेदांत घेतलेल्या हरकतीसंबंधानें माझा निर्णय असा आहे की, निवडणुकीच्या पद्धतींत गुप्त मतदान पद्धतीचा सर्वसाधारणपणे भंग झालेला नाही."

घटनेमध्ये गुप्तमतदान पद्धतीची कुठेहि तरतूद नसल्यामुळे ह्या कारणाकरिता निवडणुकीच्या वैधतेवर बाधा पडत नाही, असेंहि लवादांनी नमूद केलें.

त्यानंतर अर्जदारांनी आपल्या अर्जाच्या दुसऱ्या परिच्छेदांत घेतलेल्या हरकतीसंबंधी विचार करण्यांत आला.

१९५६-५७ ची १ वर्षाची म्हणून सुरू केलेली निवडणूक अखेरचे मतदानाचे वेळीं एकाएकी ३ वर्षांची करणें हें भ्रष्टाचाराचें व अन्याय्य आहे यासंबंधी ही हरकत होती. या हरकतीच्या समर्थनाकरितां अर्जदारांनी जे आक्षेप घेतले त्यांचे लवादांनी पुढीलप्रमाणे ३ वर्ग केले.

(क) निवडणुकीच्या सूचना व मतपत्रिकेबरोबर पाठविलेल्या कागदांत १९५६-५७ सालचा उल्लेख होता.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

(ख) घटना दुरुस्तीची अंमलबजावणी करतांना ज्या गोष्टी केल्या गेल्या त्यांची सभासदांना सूचना नव्हती. व,

(ग) निवडणुकीचें कार्य करीत असतांना चुका झालेल्या आढळतात.

वरील आक्षेपासंबंधी लवादांनी पुढीलप्रमाणे निर्णय दिला.

"**वर्ग (क)** मधील **आक्षेप**—घटना नियम १२ (अ) प्रमाणे मतपत्रिका, दि. ९ फेब्रुआरी १९५६ पावेतो मतदारांकडे पाठविणें सरचिटणीसांना भाग होतें म्हणून दि. २९ ची सभा होण्याचे पूर्वीच त्यांना मतपत्रिका, मतदानाचे नियम आदि तयार करविणें प्राप्त होतें. ते तयार करीत असतां त्यावर उल्लेख १९५६-५७ सालाचाच राहूं शकत होता. परंतु घटनेंत दुरुस्ती झाल्यानंतर तो उल्लेख तीन वर्षांचा करणें यामध्ये कोणच्याहि प्रकारची अवैधता नाही. एकंदर २८१२ मतपत्रिका व १४०६ पत्रकांवर शाईने दुरुस्त्या करण्यास फार वेळ लागला असता व त्यामुळे मतपत्रिका पाठविण्यास विलंब झाला असता म्हणून वगळ्या पत्रकाने निर्वाचनाधिकाऱ्याने तें कार्य केलें हें दोषार्ह नाही.

वर्ग (ख) मधील आक्षेपः—सर्वसाधारण सभेमध्ये जो ठराव आणि त्या ठरावान्वयें घटनेंत केल्या गेलेल्या दुरुस्त्या दि. ३० जानेवारी १९५६ पासून प्रभावी करण्यांत आल्या. दि. २ किंवा ३ ला मतपत्रिका पाठविणें आवश्यक होतें. या थोडक्या अवधींत सभासदांना (१) घटनेंत झालेल्या दुरुस्त्यांची नक्कल (२) निर्वाचनाधिकाऱ्याची नेमणूक अध्यक्षांनी केल्याची सूचना इत्यादि कागद पाठविणें शक्य नव्हतें. सर्वसाधारण सभेने घटनेंतील दुरुस्त्या दि. ३० जानेवारी १९५६ पासून प्रभावी केल्या असल्यामुळे त्यांची अंमलबजावणी न करून घटनेचा अपमान व भंग करणेंहि शक्य नव्हतें. घटना नियम २१ (इ) च्या अन्वयें जो दाखला दिला गेला आहे, तो योग्य नाही. नियम २१ (इ) ने युगवाणींत येणाऱ्या मजकुराला अधिकृतता दिली आहे. परंतु तद्व्यतिरिक्त इतर प्रकारच्या सूचनेसंबंधी त्यांत निषेध नाही. अशा परिस्थितींत माझ्या मतें जें कांही केलें गेलें तें खरोखर केलें गेलें की नाही यावरच झालेल्या गोष्टीची वैधावैधता अवलंबून आहे. या दृष्टीने पाहतां अध्यक्षांनी अंमलबजावणीच्या ठरावांत दिलेल्या अवधींत निर्वाचनाधिकारी नेमिला काय व त्या निर्वाचनाधिकाऱ्यांच्या स्वाधीन निवडणुकीच्या सर्व गोष्टी दिल्या गेल्या काय हे पाहणें अगत्याचें आहे. या प्रकरणांतील पृष्ठ ४७-५१ व ५८-५९ मधून मिळणाऱ्या माहितीप्रमाणे या दोन्ही प्रत्यक्षांत झाल्याचे दाखले आहेत. म्हणून निर्वाचनाधिकाऱ्याची नेमणूक घटनेप्रमाणे आहे. तसेंच निर्वाचनाधिकाऱ्याने जें पत्रक मतपत्रिकेबरोबर पाठविलें तें त्यांचेंच आहे असेंहि त्याने निवेदन केलें आहे. निर्वाचनाधिकाऱ्याच्या पत्रकांत घटनादुरुस्तीचा उल्लेख आहे. ही सभासदांना वस्तुस्थितींत सूचनाच आहे. जानेवारी १९५६ च्या युगवाणीच्या अंकांत (हा अंक २४ डिसेंबर १९५५ लाच प्रकाशित केला गेला होता असें सांगण्यांत आलें. परंतु त्याचें तेथे महत्व नसल्यामुळे मी त्यावर विशेष लिहीत नाही.) घटनेच्या दुरुस्तीचा मसुदा तसेंच अंमलबजावणीच्या ठरावाचाहि एक अस्थायी मसुदा होता. त्यावरून सर्वहि सभासदांना होऊं घातलेल्या गोष्टींची

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कल्पना होती. निर्वाचनाधिकाऱ्याच्या पत्रकाने ती स्पष्ट होऊन सभासदांच्या मनांत कोणचाहि गोंधळ होण्याचें कांहीच कारण नव्हतें, हें स्पष्ट आहे. प्रस्तुत निवडणुकींत जवळजवळ ११०० लोकांनी मतदान केलें, परंतु कोणाचा घोटाळा होऊन स्पष्टीकरणासाठी कोणा एकाहि मतदाराने कांही पत्र वगैरे पाठविण्याचा कोणताहि पुरावा माझ्यासमोर आला नाही किंवा तसला कांही प्रकार झाल्याबद्दलची अस्पष्ट सूचनाहि अर्जदारांनी चौकशीच्या वेळी कधी उच्चारिली नाही, ह्या एकाच गोष्टीवरून वस्तुस्थिति किती सरळ व साधी होती हें स्पष्ट आहे. निर्वाचनाधिकाऱ्याच्या पत्रकावर "अध्यक्षांच्या अनुज्ञेने" असे शब्द नाही किंवा त्यावर संघाचें बोधचिन्ह नाही व जावक नंबर नाही हा जो आक्षेप आहे, त्याचेबाबत अशा प्रकारचें कांही हवें असा कोणताहि नियम घटनेंत नाही. उलटपक्षीं 'अध्यक्षांच्या अनुज्ञेने" हे शब्द नसणेंच घटनेप्रमाणे अधिक बरोबर आहे. संघाचे मागील निवडणुकीचे प्रसंगीं कांही अधिकृत पत्रकें मतपत्रिकेबरोबर पाठविलीं गेलीं होतीं या गोष्टीशीं मला येथे कांही कर्तव्य नाही. प्रत्यक्षांत प्रस्तुत निवडणुकींत तसें कांही झालें असा आक्षेपहि अर्जदारांनी केला नाही व माझ्याहि नजरेला तसें कांही आलें नाही.

वर्ग ग) मधील आक्षेप—सरचिटणिसांनी पाठविलेल्या पत्रकांत ता. २ फेब्रुवारी घातली आहे व निर्वाचनाधिकाऱ्याच्या पत्रकावरहि ता २ च घातली आहे. ह्या प्रकरणांतील पृष्ठ ९९ वर संघाच्या कार्यवाहांनी जें निवेदन दिलें आहे त्या निवेदनांत हें स्पष्ट केलें गेलें आहे की, मतपत्रिका व त्यासोबत पाठविण्याचे सर्व कागद दि. २४ जानेवारी १९९६ लाच छापखान्यांत छापण्यासाठी पाठविले होते. त्याबर ज्या दिवशीं ते पाठवावयाचे त्या दिवशींच्या तारखा वगैरे पूर्वीच घालून ठेविल्या होत्या आणि निर्वाचनाधिकाऱ्याची नेमणूक झाल्यानंतर ते तसेच्या तसेच त्यांच्या हवालीं करण्यांत आले व त्याने ते पाठविण्याची व्यवस्था केली. असें करतांना त्याने तारखांत बदल करणें शक्य नव्हतें. कारण तें काम पूर्वीच केलें गेलें होतें आणि म्हणूनच त्याने नवीन पत्रक त्या कागदपत्रांत घातलें तेव्हा ह्यांत मोठी चूक होती, असें मला वाटत नाही. या कारणाकरिता वर्ग (ग) मधील आक्षेपांतहि अर्थ राहत नाही."

शेवटी लवादांनी पुढीलप्रमाणे निर्णय दिला.

"अशा तऱ्हेने माझ्यासमोर ज्या ज्या हरकती घेतल्या गेल्या व जे आक्षेप वेळोवेळीं उपस्थित केले गेले त्या सर्वांचा निरपेक्ष बुद्धीने विचार करतां प्रस्तुत निवडणुकी पूर्णपणें वैध आहेत असें मला वाटतें व मी निर्णय करतों की त्या वैध आहेत.

अर्जदारांचा अर्ज खारीज करण्यांत येत आहे."

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ

१९५५-५६ सालचें कार्यवृत्त

विदर्भ साहित्य संघाचा ५५-५६ सालचा अहवाल सादर करतांना मनाला आनंद वाटत आहे. यावर्षी श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांच्या मार्गदर्शनाखालीं विविध समित्यांच्या कार्याला जोराने चालना मिळाली व श्रीमान बाबासाहेबांनी देखील आपल्या अनुभवाचा व उत्साहाचा पुरेपूर उपयोग करून सर्व समित्या-उपसमित्यांची कार्यक्षमता शेवटपर्यंत कायम ठेवण्याची जबाबदारी पार पाडलेली आहे.

विदर्भ साहित्य संघाचे अधिवेशन १८ वें

मागचे वर्षी कै. हरिभाऊ नेने यांच्या दुःखद निधनामुळे विदर्भ साहित्य संघाचें अधिवेशन नागपूरलाच भरवावें लागलें. परंतु यावर्षी श्रीमान बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखालीं दि. २४-२५ डिसेंबर १९५५ रोजीं वि. सा. संघाचें अधिवेशन तुमसर येथे टिळक राष्ट्रीय विद्यालयाचे पटांगणात अत्यंत थाटाने व उत्साहाने भरविण्यांत आलें. अधिवेशनाच्या उद्घाटनाकरितां राष्ट्रसंत तुकडोजी महाराज लाभल्यामुळे एक प्रकारचा उत्साह व चैतन्य अधिवेशनांत खेळत असल्याचें सर्वांच्या प्रत्ययास आलें.

कार्यकारी मंडळाच्या सभा व साधारण सभा

१९५५-५६ सालांत आतापर्यंत कार्यकारी मंडळाच्या अधिकृत आठ आणि एक अनौपचारिक अशा एकूण नऊ सभा झाल्या. तसेंच दि. २४-४-५५ व २४-१२-५५ रोजीं दोन सर्वसाधारण सभा झाल्या असून दि. २९-१-५६ रोजीं घटना दुरुस्तीसाठी विशेष साधारण सभा भरविण्यांत आली होती.

सभासद

फेब्रुवारी १९५६ अखेर विदर्भ साहित्य संघाचे एकूण १३२१ साधारण सभासद पटावर नोंदलेले आहेत. यांत दोन संलग्न संस्था आहेत. नवीन आजीव सभासद ह्या वर्षांत २५ झाले आहेत. १५ ऑक्टोबर १९५६ रोजीं तयार झालेल्या मतदार सभासद यादीनुसार मतदार सभासद १४०२ असून त्यांत उपकर्ते सभासद ३; आश्रयदाते ७; सहायक साभसद २; हितचिंतक १ आणि आजीव सभासद १२१ आहेत. हे सर्व मिळून ह्यावर्षीची एकूण सभासदसंख्या १४५५ असून त्या व्यतिरिक्त ११ युगवाणीचे निव्वळ वर्गणीदार आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शाखा

विदर्भ साहित्य संघाच्या यंदाच्या वर्षी चालू असलेल्या एकूण आठ शाखा, रामटेक, गोंदिया, भंडारा, तुमसर, चांदा, हिंगणघाट, अमरावती आणि खामगांव ह्या ठिकाणीं अस्तित्वांत असून प्रत्येक शाखेने यंदा अत्यंत चांगलें काम केलें आहे. गोंदिया शाखेने तर वेगळी जागा मिळविली असून ती प्रसिद्ध उद्योगपति श्रीमान मनोहरभाई पटेल यांच्या दानशूर पत्नी श्रीमती सौ. दाईबेन पटेल यांनी गोंदिया शाखेच्या भवभूति स्मारकास दान दिली आहे.

समित्या आणि उपसमित्या

विदर्भ साहित्य संघाच्या, प्रकाशन; आगरकर ग्रंथलेखन पारितोषिक; भाषाविषयक संशोधन; सीमा; परिभाषा इत्यादि विविध समित्यांनी आपापलीं कामें मनःपूर्वक केलेलीं आहेत.

परीक्षा समितीचें महत्त्वपूर्ण व भरीव कार्य

परीक्षा समितीचा व्याप अभिमानास्पद वाटत असून यावर्षी परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येंत स्पृहणीय वाढ झाल्याचें दिसून येतें. यावर्षी परीक्षा समितीने एक विशेष कार्यक्रम आयोजित केलेला होता व समितीची प्रगति कसकशी होत गेली याचा आराखडा त्यांनी उपस्थितांना सादर केला. इतकेंच नव्हे तर परीक्षा समितीने परीक्षा केंद्रांत देखील वाढ केलेली असून पद्धतशीरपणाने निरनिराळ्या परीक्षांचे वर्ग घेण्याचें देखील आयोजित केलेलें आहे. परीक्षा समितीचा आराखडा खालील पटावरून आपल्या प्रत्ययास येईल.

क्र.	सन :	पारगत	स्नातक :	परिचित :	विनीत :	प्रारंभ :	प्रवेश :	एकूण विद्यार्थी :	केंद्रें
१	ऑगस्ट १९५२	६	१९	४९	२००	८८	१०	३६४	१९
२	१९५३	२	३२	५१	३३४	११५	२१	५५५	३६
३	१९५४	–	६५	६३	५९०	२३०	९२	१०४०	४२
४	१९५५	९	४३	११८	६७९	४५१	१३०	१४४०	४७
५	१९५६	२१	१२४	२२०	११४०	६१३	१३२	२२५०	६२

परीक्षा समितीने अत्यंत परिश्रमपूर्वक व चिकाटीने परीक्षांचें लोण खेडोपाडीं पोचविण्याचें श्रेय प्राप्त करून घेतलें आहे. परीक्षासमितीचा व्याप लक्षांत घेऊन विदर्भ साहित्य संघाच्या इमारतींत त्यांना स्वतंत्र कार्यालय थाटून देण्यांत आलें असून वेगळा कर्मचारी देखील त्यांना नियुक्त करून देण्यांत आलेला आहे. या व्यतिरिक्त आणखी कांही सोयी करणें आवश्यक असून त्या त्यांना उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न अवश्य व्हावयास पाहिजे.

गडकरी स्मारक समिति

दरवर्षाप्रमाणे यंदाहि गडकरी स्मारक समितीने गडकरी स्मृतिदिन प्राचार्य मोहगांवकर यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा केला. या प्रसंगीं कवि प्रफुल्लदत्त यांचें "गोविंदाग्रजांची कविता,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सतारीचे, नव्हे ! एकतारीचे बोल" या विषयावर प्रबंधवाचन झाले. तसेंच गडकरी स्मारकाच्या मदतीसाठी "संगीत श्रीमुकांत" या नाटकाचा प्रयोग 'अभिनव नाटयमंडळ' या मंडळाने केला. यावर्षी विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयासंबंधीच्या योजनांना श्री. वि. स. खांडेकर यांच्या हस्तें चालना देण्यांत येऊन ग्रंथालयाचें उद्घाटन देखील करण्यांत आलें.

नाट्य समिति

नाटय समितीने नियोजित केल्याप्रमाणे आग्र्याहून सुटका, विकार विलसित, राक्षसी महत्त्वाकांक्षा या नाटकांवर तसेंच नाटयविषयक इतर साहित्यावर श्री. विष्णुपंत जोग, ग. त्र्यं. देशपांडे, प्रा. स. गो. सोमलवार प्रभृति अधिकाऱ्यांचीं व्याख्यानें घडवून आणलीं. नवीनच अस्तित्वांत आलेल्या या समितीने अत्यंत महत्त्वपूर्ण व भरीव कार्य केलेलें आहे.

"युगवाणी" मालिक व संपादकमंडळाचें कार्य

युगवाणीच्या संपादक मंडळाने यावर्षी कै. भाऊजी दफ्तरी यांची उपनिषद्विषयक व्यासंगपूर्ण लेखमाला प्रसिद्ध केली. तसेंच ऐतिहासिक पत्रांवरील लेख व विविध क्षेत्रांतील साहित्य प्रसिद्ध करून युगवाणीच्या सजावटींत मंडळाने वैशिष्टयपूर्ण भर घातलेली आहे. युगवाणीचें मुद्रण, नारायण मुद्रणालय येथे झालें असून त्या मुद्रणालयाचे व्यवस्थापक, श्री. पां. ना. बनहट्टी यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

मंदिर निधि समिति

विदर्भ साहित्य संघाच्या मंदिरनिधि आणि मंदिर रचना ह्या दोन समित्यांनी रंगमंदिराच्या योजनेसाठीं परिश्रमपूर्वक कामें केलीं असून नियोजित रंगमंदिराच्या नकाशाची तयारी पूर्ण होत आलेली आहे. यावर्षी एकूण ३३१४ रुपये मंदिरनिधिसमितीने वर्गणीच्या रूपाने घरोघरीं फिरून गोळा केले असून श्रीमंत बाबुराव देशमुख यांनी २५०१ रुपयांचें अभिवचन दिलेलें आहे. तसेंच श्री. अ. त्र्यं. कोठेकर यांनी रु. २५०० ची रोख देणगी दिली आहे. रंगमंदिरासाठी सरकारकडून आणखी अधिक जागा मिळावी व रंगमंदिरासाठी ५० टक्के अनुदान प्राप्त व्हावें यासाठी योग्य ते प्रयत्न केले जात आहेत. शक्य तितक्या लवकर रंगमंदिर उभारलें जाईल असा कसोशीचा प्रयत्न केला जात आहे.

सांस्कृतिक कार्यक्रम समिति

यावर्षी सांस्कृतिक कार्यक्रम समितीने निरनिराळ्या विविध विषयांवर औचित्यपूर्ण व्याख्यानें घडवून आणलीं. समितीतर्फे झालेल्या कार्यक्रमांत श्री. श्री ल. पांढरीपांडे; डॉ रा. शं. वाळिंबे; डॉ. वि. ना. पंडित; पं. श्री. दा. सातवळेकर; श्री. त्र्यं कृ. टोपे; श्री. वि. वा. शिरवाडकर; साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास, प्रा. अ. ना देशपांडे; प्रा. ग. त्र्यं. देशपांडे आदि विद्वानांचीं व्याख्यानें नाटय, साहित्य, काव्य इत्यादि विषयांवर झालीं. तसेंच चिनी सांस्कृतिक शिष्ट-मंडळाच्या भेटीच्या कार्यक्रमाचें आयोजनहि समितीनेच केलें होतें. मुंबई विधान सभेचे अध्यक्ष

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री. नानासाहेब कुंटे यांनी विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. हा कार्यक्रम देखील समितीनेच आयोजित केलेला होता.

यावर्षी समितीने सुरुवातीलाच एक अभिनव अशा तऱ्हेची योजना आखली व कांही विद्वान व सन्मान्य वक्त्यांचीं भाषणें मानद्रव्य देऊन वि. सा. संघांत घडवून आणलीं. या उपक्रमामुळे अत्यंत विद्वत्ताप्रचुर अशा भाषणांचा लाभ सदस्यांना देण्याचें श्रेय समितीलाच द्यावें लागेल.

याव्यतिरिक्त प्रा. सोनोपंत दांडेकर यांची व्याख्यानमाला संतवाङ्मयावर गुंफण्याची योजना या समितीने आखून पूर्णतः यश संपादन केलेलें आहे. इतकेच नव्हे तर वारकरी पद्धतीने कीर्तनाचें आयोजन करून समितीने एक नवा पायंडा पाडलेला आहे.

वि. सा. संघाची आर्थिक स्थिति

यावर्षी वि. सा. संघाने शैक्षणिक, सांस्कृतिक, बौद्धिक व भाषा आणि साहित्यविषयक कार्यासाठी अधिकाधिक रक्कम खर्च केली असून लोकसेवा साधण्याचा कसोशीने प्रयत्न केला आहे. मध्यप्रदेश सरकारकडून मिळणारें ७५०० रु. चें उदार अनुदान विशेषतः भाषा, साहित्य, संस्कृति, संशोधन आदि कामासाठींच खर्च करण्याचा प्रयत्न केला जातो. विदर्भ साहित्य संघाचा वाढता व्याप लक्षांत घेता अंदाजपत्रकाच्या मानाने खर्च काटेकोर केला गेला आहे.

सोबत जोडलेल्या १९५५-५६ सालच्या जमखर्चाच्या हिशेबाच्या तक्त्यावरून वि. सा. संघाच्या आर्थिक स्थितीसंबंधी यथार्थ कल्पना येईलच.

विदर्भ साहित्य संघाच्या अनेक लहानथोर कार्यकर्त्यांनी दैनंदिन कार्यक्रमामध्ये जातीने लक्ष घालून आम्हाला पूर्णतः सहकार्य दिलेलें आहे. या सहकार्याच्या अभावीं आपण अत्यंत विश्वासाने टाकलेली जबाबदारी पूर्ण करणें आम्हाला शक्य झालें नसतें. या सहकार्याबद्दल आम्ही सदैव ऋणी आहोंत. आपण सोपविलेली जबाबदारी पार पाडतांना कांही कमी अधिक हातून घडल्यास आपण उदार अंतःकरणाने क्षमा करावी व ही अल्प सेवा गोड करून घ्यावी ही विनंती.

ल. वि. पांढरीपांडे,
सरचिटणीस, वि. सा. संघ, १९५५-५६

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परीक्षा समितीचा कार्यक्रम : ऑगस्ट १९५६

—कार्यक्रम—	सत्र १ : आगस्ट ५६
(१) परीक्षा आरंभ तारीख	१८–८–५६
(२) नव्या केंद्रांकरितां आवेदन पाठविण्याची तारीख	५–७–५६
(३) आवेदनपत्रें केंद्राधिकाऱ्याकडे पाठविण्याची अंतिम तारीख	१०–७–५६
(४) परीक्षासमितीकडे प. आवेदनपत्रें पाठविण्याची तारीख	१५–७–५६
(५) परीक्षाफल घोषित होण्याची अंतिम तारीख	१५–१०–५६
(६) प्रमाणपत्रें प्राप्त होण्याची अंतिम तारीख	१–११–५६

(प्रा.) माणिक के. वैतुले
संचालक

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर (म. प्र.)

३१-३-१९५६ रोजीं संपणाऱ्या वर्षाचा जमाखर्चाचा तक्ता

जमा

आरंभीची शिल्लक		
नगदी जवळ	०-३-०	
बंकेंत	११,९६७-५-३	
मुदतीची ठेव	३,५००-०-०	१५,४६७-८-३
वर्गणी		
साधारण सभासद	३,९६७-०-०	
आजीव सभासद	१,३०२-०-०	५,२६९-०-०
परीक्षा शुल्क		७,१८१-३-०
किरकोळ जमा		४८१-०-१
इतर देणग्या		२६-०-०
सरकारी अनुदान		७,५००-०-०
मंदिर निधि		९,६२६-०-०
पुस्तक विक्री		१२३-१२-०
ठेवीवरील व्याज		३२४-८-०
तैलचित्रासाठी—लो. अणे ह्यांच्या		२५-०-०
कै. नेने स्मारक निधि		७५-०-०
सांस्कृतिक समिति		१,१२६-१२-०
गडकरी स्मारक समिति		
आरंभीची शिल्लक	२४३-३-०	
देणग्या	२७७-१-०	५२०-४-०
		४७,७४५-१५-३

खर्च

वेतन खर्च		५,०७९—८-६
पोस्टेज, फोन		५७०-१४-०
प्रिंटिंग व स्टेशनरी		१,४८१—९-०
युगवाणी मुद्रण		४,२५४-१०-६
प्रवास व वाहन		७६८-१२-०
किरकोळ खर्च		१३९-१०-९
सांस्कृतिक कार्यक्रम		१,०६९—७-९
नाट्य समिति		२०—३-०
आतिथ्य खर्च		२४—९-६
वीज खर्च		५९६-१५-०
वस्तू खरेदी		१,६४२—६-३
बँक कमिशन		१४—८-०
अंशदान		२६३—८-०
परीक्षा खर्च		५,५००—०-०
कार्यालयीन खर्च व शाखा साहाय्य		१,५१०-११-६
ट्रान्सफर फ्रॉम जनरल फंड टू आईल पेंटिंग		२५—०-०
ससपेन्स अकौंट		२४—०-०
मंदिर रचना		२,३१०-१४-०
गडकरी समिति		१६७—३-६
गडकरी समिति शिल्लक		३५३—०-६
बॅंकेंत		
(१) म. प्र. को. बँक	३०१-११-९	
(२) म. प्र. को. हॉउसिंग सोसायटी	४,२५८-१३-३	
(३) महाराष्ट्र बँक (करंट अकौंट)	३,८४१-१३-३	
(४) महाराष्ट्र बँक (बिल्डिंग)	७,९८२-३-९	१६,३८९-१०-०
मुवतीची ठेव		
मागील वर्षाची	३,५००—०-०	
यंदाची	२,०००—०-०	५,५००-०-०
अखेरची शिल्लक जवळ		४५-१३-६
		४७,७४५-१५-३

तपासलें व बरोबर आहे

(सही) महेश्वर गद्रे आणि कं. चार्टर्ड अकाउंटंटस्

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Vidarbha Sahitya Sangh, Nagpur (M. P.)

Receipts and Payments Statement for the Year ended on 31st March 1956

(1-4-1955 to 31-3-1956)

RECEIPTS	Rs. A. P.	Rs. A. P.
To. Opening Balances:—		
Cash in hand	0-3-0	
Cash at Bank	11,967-5-3	
Fixed Deposits	3,500-0-0	15,467—8-3
Subscriptions		
Ordinary		
Members	3,967-0-0	
Life Members	1,302-0 0	5,269—0-0
Examination fees		7,181—3-0
Miscellaneous receipts		481—0-0
Donations—		26—0-0
Government Grant		7,500—0-0
Building Grants		9,626—0-0
Sale of Books		123-12-0
Interest on Fixed Deposits		324—8-0
Donations for oil painting of Sri. Aney		25—0 0
Late Sri. Nene Smarak Fund		75—0 0
Cultural Committee		1,126-12-0
Gadkari Smarak Samiti—		
Opening Balance	243-3-0	
Donations of the year	277-1-0	502—4-0
Total Rs.		47,745-15—3

PAYMENTS		Rs. As. Ps.
By Salaries		5,079—8-6
„ Postage, Telegrams & Telephones		570-14-0
„ Printing & Stationery		1,481—9-0
„ Yugawani Printing		4,254-10-6
„ Travelling & Conveyance		768-12-0
„ Miscellaneous Expenses		139 10-9
„ Cultural Activities		1,069—7-9
„ Drama Committee Expenses		20—3-0
„ Entertainment expenses		24—9-6
„ Electric charges		596-15-0
„ Purchase of Articals		1,642—6-3
„ Bank Commission		14—8-0
„ Branche's Share		263—8-0
„ Examination expenses		5,500—0-0
„ Office expenses (at Branches and H. O.)		1,510-11-6
„ Transfer to General Fund for oil painting of Sri. Aney		25—0-0
„ Suspense Account		24—0-0
„ Building Committee expenses		2,310-14-0
„ Expenses of Gadkari Samiti		167—3-6
„ Cash with Gadkari Samiti		353—0-6
„ Cash at Banks'		
1 with M. P. Co-operative Bank, Ltd.,	301-11-9	
2 with M.P Co-op. Housing Society.	4,258-13-3	
3 with Maharashtra Bank (Current A/c)	3,841-13-3	
4 with Maharashtra Bk. (Building A/c)	7,980-3-9	16,382-10-0
„ Fixed Deposits—		
Balance as per last year.	3,500—0-0	
Additions during the year	2,000—0-0	5,500—0-0
„ Cash in hand—		45-13-6
		47,745-15-3

Examined and found correct.

(Sd.) **Maheshwar Gadre Co.**

Chartered Accountants

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर (म. प्र.)

३१ मार्च १९५६ रोजीं असलेले 'बॅलेन्स शीट'

फंड व लायबिलिटीज्	रु. आ. पं.	रु. आ. पं.
आजीव सभासद		
मागील बॅ. शी. मधील शिल्लक	३,५६२—०—०	
चालू सालांतील जमा	१,३०२—०—०	४,८६४—०—०
मंदिर निधि		
मागील बॅ. शी. मधील शिल्लक	५२,३९८—१२—०	
चालू सालांतील जमा	९,६२६—०—०	६२,०२४—१२—०
सरकारी मंदिर ग्रँट		३०,३३३—०—०
कै. नेते स्मारक फंड		७५—०—०
तैलचित्रासाठी		
मागील बॅ. शी. मधील शिल्लक	१५०—०—०	
ट्रान्सफर फ्राम जनरल फंड	२५—०—०	१७५—०—०
सस्पेन्स अकौंट		२३६—१—३
जनरल फंड		
मागील बॅ. शी. मधील शिल्लक	३१,८९३—४—३	
ट्रान्सफर टू पेंटिंग अकौंट	२५—०—०	
	३१,८६८—४—३	
उणे एक्सेस ऑफ एक्सपेंडिचर ओव्हर इनकम	२११—१२—०	३१,६५६—८—३
		१,२९,३६४—५—६

अॅसेट्स् व प्रापर्टी	रु. आ. पै.	रु. आ. पै.
टिनशेड व विहीर		५,३४१—१३—९
इलेक्ट्रीक डिपॉझिटस्		३३१—०—०
फर्निचर		
मागील बॅ. शी. मधील शिल्लक	५,९७२—३—३	
यंदाची खरेदी	१,६४२—६—३	७,६१४—९—६
मंदिर रचना		
मागील बॅ. शी. प्रमाणे	९१,४४४—०—३	
यंदाची वाढ	२,३१०—१४—०	९३,७५४—१४—३
पुस्तकें		४०—९—०
मुदतीची ठेव		
मागील बॅ. शी. मधील शिल्लक	३,५००—०—०	
यंदाची	२,०००—०—०	५,५००—०—०
बँकेंत		
म. प्र. को. ऑप. बँक	३०१—११—९	
म. प्र. को. हॉउसिंग सो.	४,२५८—१३—३	
महाराष्ट्र बँक (करंट अकौंट)	३,८४१—१३—३	
,, ,, (बिल्डिंग फंड)	७,९८०—३—९	१६,३८२—१०—०
अखेरची शिल्लक		
गडकरी समिति जवळ		३५३—०—६
रोख जवळ		४५—१३—६
		१,२९,३६४—५—६

प्रमाण पत्र—विदर्भ साहित्यसंघ या संस्थेच्या ३१ मार्च १९५६ रोजी तयार असलेल्या बॅलेंसशीटमध्ये वर दिलेले आकडे संघाच्या जमाखर्चाच्या पुस्तकांशी तंतोतंत जुळतात आणि हीं पुस्तकें आम्ही तपासलीं असून तीं बरोबर आहेत असें प्रमाणपत्र आम्ही देतों.

(सही) महेश्वर गद्रे आणि कं. चार्टर्ड अकाउंटंट्स्

नागपूर, दि. १९ एप्रिल १९५६

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

Vidarbha Sahitya Sangh, Nagpur (M. P.)

Balance Sheet as at 31st March 1956

FUNDS AND LIABILITIES	Rs. A. P.	Rs. A. P.
Life Members		
Balance as per last B/sheet	3,562—0—0	
Additions during the year	1,302—0—0	4,864—0—0
Mandir Fund		
Balance as per last B/sheet	52,398-12—0	
Aditions during the year	9,626—0—0	62,024-12—0
Government Building Grant		30,333—0—0
Late Shri Nene Smarak Fund		75—0—0
For Painting		
Balance as per last B/sheet	150—0—0	
Transfer from General Fund	25—0—0	175—0—0
Suspense Account		236—1—3
General Fund		
Balance as per last B/sheet	31,893—4—3	
Less-Transfer to Painting	25—0—0	
	31,868—4—3	
Less—Excess of Expenditure over Income B/o from I/E St..,	211-12—0	31,656—8—3
Total Rs		1,29,364—5—6

ASSETS AND PROPERTIES.	Rs. A. P.	Rs. A. P.
Tinshed And Well		5,341-13—9
Electric Deposits		331—0—0
Furniture & Fixtures		
Balance as per last B/sheet	5.972—3—3	
Additions during the year	1,642—6—3	7,614—9—6
Mandir Buildings		
Balance as per last B/sheet	91,444—0—3	
Additions during the year	2,310-14—0	93,754-14—3
Books		40—9—0
Fixed Deposits		
Balance as per last B/sheet	3,500—0—0	
Additions during the year	2,000—0—0	5,500—0—0
Bank Deposits		
Cash at M. P. Co-operative Bank Ltd.	301-11—9	
Cash at M. P. Co-op. Housing Society.	4,258-13—3	
Cash at Maharashtra Bank (Current)	3,841-13—3	
Cash at Maharashtra Bk. (Building A/c)	7,980—3—9	16,382-10—0
Gadkari Samiti		353—0—6
Cash In Hand		45-13—6
Total Rs		1,29,364—5—6

Certificate—Certified that the figures shown in the above Balance Sheet of the VIDARBHA SAHITYA SANGH, Nagpur as on 31st March, 1956 agree with the books of accounts maintained which have been audited by us are found to be correct.

Dated, Nagpur, the 14th April 1956

(Sd.) Maheshwar Gadre & Co.,
Chartered Accountants.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघ, नागपूर; म. प्र.

३१-३-१९५६ रोजीं संपणाऱ्या वर्षाच्या आयव्ययाचा तक्ता
(१-४-१९५५ ते ३१-३-१९५६)

आय		व्यय	
साधारण सभासद वर्गणी	३,९६७—०-०	वेतन खर्च	५,०७९—८-६
परीक्षा शुल्क	७,१८१—३-०	पोस्टेज व फोन	५७०-१४-०
किरकोळ जमा	४८१—०-०	मुद्रण व स्टेशनरी	१,४८१—९-०
सरकारी अनुदान	७,५००—०-०	युगवाणी मुद्रण	४२५४-१०-६
इतर देणग्या	२६—०-०	प्रवास व वाहन	७६८-१२-०
सांस्कृतिक समिति	१,१२६-१२-०	किरकोळ खर्च	१३९-१०-९
पुस्तक विक्री	१२३-१२-०	सांस्कृतिक कार्यक्रम	१,०८९-१०-९
ठेवीवरील व्याज	३२४—८-०	आतिथ्य खर्च	२४-९-६
गडकरी समिती	५२०—४-०	वीज खर्च	५९६-१५-०
एक्सेस ऑफ एक्सपेंडिचर		बँक कमिशन	१४—८-०
ओव्हर इन्कम	२११-१२-०	अंशदान	२६३—८-०
		परीक्षा खर्च	५,५००—०-०
		कार्यालयीन खर्च व शाखा साहाय्य	१,५१०-११-६
		गडकरी समिति खर्च	१६७—३-६
	२१,४६२—३-०		२१,४६२—३-०

तपासलें व बरोबर आहे.

(सही) महेश्वर गद्रे आणि कं.
चार्टर्ड अकौंटन्ट्स

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Vidarbha Sahitya Sangh

NAGPUR M. P.

Income and Expenditure Statement for the Year ended on 31st March 1956

(1-4-19 5 to 31-3-1956)

INCOME	Rs. As. Ps.
To, Subscriptions from Ordinary Members	3,967—0—0
Examination Fees	7,181—3—0
Miscellaneous receipts	481—0—0
Government Maintainance Grant	7,500—0—0
Donations	26—0—0
Sanskrutik Samiti	1,126-12—0
Sale of Books	123-12—0
Interest on Fixed Deposits	324—8—0
Gadkari Samiti	520—4—0
Excess of Expenditure over Income carried over to Balance Sheet	211-12—0
Total Rs.	21,462—3—0

EXPENDITURE	
By Salaries	5,079—8—6
Postage, Telegrams and Telephones	570-14—0
Printing & Stationery	1,481-9—0
Yugwani Printing	4,254-10—6
Travelling & Conveyance	768-12—0
Miscellancous Expenses	139-10—9
Cultural Activities	1,089-10—9
Entertainment Expenses	24—9—6
Electric Charges	596-15—0
Bank Commissions	14—8—0
Branche's Share	263—8—0
Examination expenses	5,500—0—0
Office expenses– (at Branches and H. O.,	1,510-11—6
Expenses of Gadkari Samiti	167—3—6
Total Rs.	21,462—3—0

Examined And Found Correct.

Maheshwar Gadre Co
Chartered Accountants

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मंदिर समिति—विदर्भ साहित्य संघ,
नागपूर; म. प्र.

(१-४-१९५५ ते ३१-३-१९५६) ३१ मार्च १९५६ ला संपणाऱ्या वर्षाच्या आयव्ययाचा तक्ता

आय		व्यय	
आरंभीची शिल्लक	२९-१०-३	पोस्टेज व स्टेशनरी	१६८-१४-६
बिल्डिंग फंड खात्यातून काढलेली एकण रक्कम	२,३१०-१४-०	एस्टॅब्लिशमेंट	४०—४-०
हात-उसने	११—९-९	प्रवास व वाहन	२९४—७-०
		किरकोळ	१—४-६
		बांधकामाकरिता मजूरी	४५४—६-०
		रेती	२१—८-०
		सेरेमोनिज	४६७—०-०
		नकाशे व आराखडे	४—६-०
		विजेचें सामान	९००—०-०
	२,३५२—२-०		२,३५२—२-०

तपासलें व बरोबर आहे.

नागपूर, दि. १९ एप्रिल १९५६

(सही) महेश्वर गद्रे आणि कं.
चार्टर्ड अकौंटन्ट्स्

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

Building Committee (Mandir Samiti) Vidarbha Sahitya Sangh
NAGPUR, M. P

Receipts and Payments Statement for the Year ended on 31st March 1956

(1-4-1955 to 31-3-1956)

	RECEIPTS	Rs. As. Ps.		PAYMENTS.	Rs. As. Ps.
To	Opening Balance	29-10—3	By	Postage & Stationery	168-14—6
	Total Withdrawals during the year from Building Fund Account	2,310-14—0		Establishment	40—4—0
,,	Temporary Loan	11—9—9		Travelling & Conveyance	294—7—0
				Miscellaneous	1—4—6
				Constructional Wages	454—6—0
				Sand	21—8—0
				Ceremonies	467—0—0
				Maps & Drawing	4—6—0
				Electrical Installations	900—0—0
	Total Rs.	2,352—2—0		Total Rs.	2,352—2—0

Nagpur, Dated 19th April 1956

Examined and Found Correct
Maheshwar Gadre & Co.
Charterd Accountants

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ